
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सोळावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१५

## संपादकीय

### 'धोरणी' शिक्षण

सोमवार, १६ नोव्हेंबर २०१५ च्या Economic Timesनी पहिल्याच पानावर एक धक्कादायक बातमी छापली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) ६ नोव्हेंबरच्या पत्रकाद्वारे भारतातल्या सुमारे दहा अभिमत किंवा स्वायत्त दर्जा असलेल्या उच्चशिक्षण संस्थांना, आपल्या नोंदणीकृत भौगोलिक परिसराव्यतिरिक्त स्थापन केलेल्या सर्व केंद्रांना बंद करण्याचा आदेश दिला. या दहा संस्थांमध्ये टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR), भुवनेश्वर येथील विज्ञान आणि संशोधनामध्ये काम करणारी होमी भाभा संस्था, मुंबईच्या नरसी मोंजींची बंगलुरू, हैद्राबाद आणि शीवपुरची केंद्रे, बिटस् पिलानीची गोवा आणि हैद्राबादमधील केंद्रे आणि अशाच महत्त्वाच्या काही संशोधन संस्थांचा या यादीमध्ये समावेश आहे.

आज भारतामध्ये सरकारी माध्यमातून हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करूनही यातल्या बहुतेक संस्थाचा शैक्षणिक दर्जा हा सुमार आहे. वर उल्लेख केलेल्या आणि UGCनी आक्षेप घेतलेल्या १० संस्थांचा मात्र याला अपवाद आहे. वास्तविक ही गोष्ट सामान्य ज्ञानाची आहे की, समाजाच्या वाढत्या गरजा संशोधनाच्या कक्षा विस्तारीत नेते. नवीन संशोधनाकरता अनेक नवीन उपकरणे आणि साधनांची गरज असते. यात नवीन ग्रंथालय आणि प्रयोगशाळांचाही समावेश असतो. शिवाय या संशोधनांचा संबंध हा उच्चशिक्षणाशीही असतो. अस्तित्वातील भौगोलिक आराखड्यामध्ये हा विकास किंवा बदल करणे अशक्य असते. साहजिकच या संशोधन संस्थांना नवीन जागा शोधाव्या लागतात. अशा उच्चदर्जाच्या संशोधनाच्या सुविधा भारतासारख्या मोठ्या देशांमध्ये वेगवेगळे प्रांत आणि केंद्रांमध्ये करणे आवश्यक असते. या अपरिहार्य कारणाकरता या संशोधन संस्था भारतामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी विकसित होत गेल्या. शिवाय यातल्या बहुसंख्य संस्थांमधील शिक्षण आणि संशोधन हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. अणु आणि अंतराळ प्रकल्पांना या संशोधनांचा फार मोठा फायदाही झाला आहे. IIT किंवा IIM बुद्धिमान विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करतात, तर वर उल्लेखलेल्या संस्था प्रत्यक्ष संशोधनाकरता या विद्यार्थ्यांना व्यासपीठ निर्माण करून देतात.

तंत्रज्ञानामुळे किंवा इतर काही कारणांमुळे शिक्षण किंवा संशोधन साधनांमध्ये कायम बदल होत असतो. या बदलांचा सुसंगत असा बदल, कायदा किंवा नियंत्रणांमध्येही करायला लागतो. तसा बदल कायद्यांमध्ये झाला नाही तर असे कायदे कालबाह्य होतात आणि प्रगतीच्या मार्गावर ते अडथळा होऊन बसतात.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आज कुठलेही वर्तमानपत्र उघडले तर तीन महत्त्वाच्या विषयांवरील बातम्यांनी त्यांचे पहिले पान भरलेले असते. ते विषय म्हणजे, भ्रष्टाचार, बलात्कार आणि नवीन शैक्षणिक धोरणं. या धोरणांमध्ये राज्य आणि केंद्र या दोघांचाही समावेश असतो. येणारं प्रत्येक नवीन सरकार आणि मंत्री हा अशा नवीन धोरणांचा पाऊस पाडत असतो. शिवाय ही धोरणं जास्तितजास्त पुरोगामी आणि प्रगतशील दिसावीत म्हणून परीक्षा सोपी करणं, नापासांच्या मानसिक प्रकृतीची काळजी घेणे, गरीब, मागासलेले, दलित, स्त्रिया, ग्रामीण, शहरी या सगळ्या विशेषणांचा वापर करून समाजाला विभागण्यात येते, आणि मग फुकटेपणाची खैरात करत, हा धोरणांचा पाऊस पाडला जातो. आधी दिलेली आश्वासनं आणि धोरणांचं काय झालं? असा प्रश्न येथे विचारायचा नसतो. शिक्षकांचे पगार, पुस्तकांची छपाई, शैक्षणिक शुल्क, वर उल्लेखलेल्या सर्व घटकांचं आरक्षण, हे कमी पडतं म्हणून की काय, शाहू, फुले, आंबेडकर आणि आपल्या राजकीय सैद्धान्तिक विचारांच्या जवळ असलेल्या व्यक्तींच्या जयंत्या आणि त्यांच्या नांवानी योजना, यांचाही या 'शिक्षणा'मध्ये समावेश असतो. तरीही आपले शिक्षण 'परिपूर्ण' होत नसल्यामुळे नवीन धोरणांच्या घोषणांचा रतीब अखंडपणे चालू राहतो.

गेल्या साठ वर्षांत ही प्रक्रिया अव्याहतपणे चालू असल्यामुळे सगळ्याच शिक्षणप्रक्रियेचा 'विचका' झाला आहे. परीक्षांचे निकाल ९०% च्या वर लागूनही शैक्षणिक दर्जाच्या बाबतीत, कुठलाच घटक समाधानी नाही. यामध्ये एका यंत्रणेचे मात्र चांगलेच फावले आहे. ते म्हणजे त्या त्या वेळचे राज्य आणि केंद्रातील शिक्षणमंत्री, आणि त्यातूनच निर्माण झालेली प्रचंड नोकरशाही. मंत्री होण्याकरता किंवा नगरपालिकांच्या शिक्षणविभागाचे सदस्य होण्याकरता, कुठल्याच किमान शैक्षणिक पात्रतेची अट अस्तित्वात नाही! शिक्षकाला, विद्यार्थ्याला, शैक्षणिक संस्थांना मात्र अनेक पात्रतांचे निकष आणि कायद्याची बंधने! यातूनच निर्माण होते ती 'बधीर' आणि 'भ्रष्ट' शिक्षण यंत्रणेतील नोकरशाही. सध्याच्या भारतातील बऱ्याच विद्यापीठातील किंवा प्राथमिक शिक्षणाशी निगडित असलेल्या जिल्हा परिषदांमधील राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार आणि बेजबाबदारपणा बघितल्यावर, आहे तो शैक्षणिक दर्जाही कमी नाही असेच म्हणावे लागेल! आपल्या या सगळ्या 'अकार्यक्षमते'वर पांघरूण घालण्याकरता मग 'दोषाचे' धनी शोधण्याचे काम चालू होते. अर्थातच यामध्ये दोन घटक म्हणजे 'शिक्षक' आणि 'शैक्षणिक संस्था' यांच्या डोक्यावर हे खापर फोडण्यात येते.

वास्तविक शिक्षण ही एक जन्माला आल्यापासून चालू होणारी प्रक्रिया असते. अनुभव हा तिचा मूळ गाभा असतो. हा अनुभव प्रत्येकजण जेवढा शाळेत घेत असतो, त्याहीपेक्षा जास्त वेळ घरात आणि समाजात घेत असतो. शाळा माहिती देण्याचं काम करते, तर शाळेबाहेरील व्यवहार प्रत्यक्ष जीवन जगायला शिकवत असते. म्हणूनच या शिक्षण प्रकियेमध्ये 'शाळा', 'कुटुंब' आणि 'समाज' हे तीनही घटक सारखेच महत्त्वाचे असतात. भारताच्या शिक्षणाच्या संदर्भात १८८२ साली मॅक्सम्युलरचे या संदर्भातले निरीक्षण फार बोलके आहे.

"There is such a thing as social education and education outside of books; and this education is distinctly higher in India than in any part of christendom. Through recitation of ancient stories and legends, through religious songs and passion plays, shows and pageants through ceremonials a sacraments, through fairs and pilgrimages, the Hindu masses all over India receive a general culture and education which are in no way lower, but positively higher, than the general level of culture and education received through schools and newspapers, or even through the ministration of the Churches in Western Christian lands. It is an education not in the so called three R's, but in humanity."

(पृष्ठ क्र.४० वर)



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सोळावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | सिम रेप येथील पुरातत्व उपवन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध-२ सिक्कीम (भाग : १) | श्री. नरेंद्र गोळे | ८ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : २१) | श्री. अरविंद ओक | १३ |
| ५) | लोकसंख्या आणि सवयी | श्री. मनोहर तळेकर | १६ |
| ६) | महानुभाव दर्शन | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १७ |
| ७) | देवीचे ‘‘नवरात्र’’ | सौ. साधना कारंडे-जोशी | २२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# सिम रेप येथील पुरातत्त्व उपवन

*कंबोडिया देशात सिम रेप शहराजवळ एक मोठे उपवन आहे. या उपवनात अनेक प्रकारची मंदिरे आहेत. या मंदिर संकुलाच्या भेटीवर आधारित हा लेख लिहिलेला आहे - संपादक*

इसवी सन ९०० ते १२०० या कालावधीत कंबोडिया देशाच्या सिम रेप या गावाजवळ एक मोठे मंदिर संकुल निर्माण करण्यात आले. त्या वेळच्या हिंदू राजांनी या कामी पुढाकार घेतला होता. हिंदू धर्मातील ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन प्रमुख देवतांची येथे मंदिरे आहेत. अनेक वर्षे ऊन-पावसात राहिल्याने या मंदिरांची आता पडझड झाली आहे. तरीही 'जगातील सर्वात मोठे मंदिर संकुल' असाच त्याचा उल्लेख केला जातो. युनेस्को या संस्थेने या ठिकाणाला वर्ल्ड हेरिटेज साईट म्हणून मान्यता दिली आहे. अशा महत्त्वाच्या ठिकाणाला भेट देणे म्हणजे एक पर्वणी असते. योगायोगाने २०१५ सालच्या फेब्रुवारी महिन्यात या संकुलाला भेट देण्याची संधी मला मिळाली. त्या भेटीची सविस्तर माहिती या लेखात दिलेली आहे.

नाप पेन हे कम्बोडिया देशाच्या राजधानीचे शहर. तेथून बसने आम्ही सिम रेप शहरात पोहोचलो तेव्हा रात्र झाली होती. एका हॉटेलमध्ये आमची राहण्याची व्यवस्था आम्ही आधीच करून ठेवली होती. ते हॉटेल म्हणजे एक दुमजली राहते घरच होते. त्या घरातील खोल्यांमध्ये योग्य त्या सुधारणा करून त्याला हॉटेलचे रूप दिले होते. एक इटालियन माणूस ते हॉटेल चालवितो. त्याच्याखेरीज आणखी एक माणूस तेथे कामाला आहे. हॉटेलमध्ये एकूण दहाच खोल्या असल्याने एवढे मनुष्यबळ त्यांना पुरेसे आहे. हॉटेल मालकाने आम्हाला घेण्यासाठी बस स्टँडवर एक टुकटुक पाठविली होती. आम्ही हॉटेलमध्ये पोहोचताच आम्हाला खोली देण्याच्या आधीच, 'उद्या तुम्हाला मंदिर बघायला जायचे आहे काय?' असा प्रश्न त्याने उपस्थित केला. आम्ही त्याच्याचसाठी येथे आलो आहोत हे कळल्यावर, 'तुम्हाला उद्या टुकटुक लागणार आहे का?' अशी विचारणा त्याने केली. आम्ही दुसरी कोणतीही व्यवस्था केली नसल्याने त्याच्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर दिले आणि त्यासाठी काय शुल्क पडेल याची विचारणा केली. एका दिवसासाठी १५ अमेरिकन डॉलर्स असा तिथे दरच आहे. आम्ही तो मान्य करताच त्याने टुकटुक चालकाला दुसऱ्या दिवशी सकाळी येण्याची सूचना दिली. ठरल्याप्रमाणे तो दुसऱ्या दिवशी सकाळी आपले वाहन घेऊन हजर झाला. हॉटेल मालकाने दिलेला नाश्ता घेऊन आम्ही भटकंतीला सुरुवात केली.

सिम रेप शहर तसे छोटेसेच आहे. परंतु कंबोडिया मधील ते एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ असल्याने तेथे हॉटेल्स मोठ्या संख्येने आहेत. आमच्या राहण्याच्या ठिकाणाहून आम्ही जेव्हा मंदिर-संकुलाकडे जाऊ लागलो तेव्हा आम्हाला वाटेत अनेक हॉटेल्स दिसली. गावातले रस्ते रूंद असून चांगल्या अवस्थेत होते. रस्त्यावरील सर्व वाहतूक एकाच दिशेला जात आहे असे आम्हाला जाणवले. कारण सकाळची वेळ असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने मंदिर-संकुलाकडे चालले होते. टुकटुक हे तिथले सर्वांच्या पसंतीचे वाहन आहे. त्यामुळे रस्त्यावर याच वाहनांची संख्या जास्त होती. आमच्याप्रमाणे इतर अनेक पर्यटकांनी हेच वाहन घेतले होते. मधूनमधून पर्यटन कंपन्यांची मोठी वाहने दिसत होती. परंतु त्यांची संख्या खूपच कमी होती. साधारणपणे अर्धा तास प्रवास करून आम्ही मंदिर-संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचलो.

मंदिर-संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अनेक वाहने आधीच उभी होती. प्रवेश तिकीट घेण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडाली होती. आता येथे किती वेळ लागेल याची काळजी करीतच आम्ही रांगेत उभे राहिलो. प्रवेशाचे

तिकीट देण्यासाठी तेथे अनेक खिडक्या आहेत. काही ठिकाणी एक दिवसाचे तर काही ठिकाणी दोन/तीन दिवसांचे तिकीट मिळते. संपूर्ण आठवड्याचे तिकीट पाहिजे असेल तर ते देखील देण्याची सोय काही विशिष्ट खिडक्यांवर केलेली आहे. आम्हाला एकाच दिवसाचे तिकीट हवे होते. त्यानुसार योग्य खिडकी शोधून रांगेत उभे राहिलो. आजूबाजूला नजर टाकली तर वेगवेगळ्या देशांची माणसे रांगेत उभी असल्याचे लक्षात आले. त्यात युरोपियन लोकांचा भरणा अधिक होता. एवढ्या लांबून लोक येथील मंदिर पाहायला येतात हे पाहून जरा आश्चर्य वाटले. एका दिवसासाठी प्रवेश शुल्क २० अमेरिकेन डॉलर्स एवढे आहे. नोंद घेण्याची गोष्ट अशी की, रक्कम डॉलर्स मध्येच घेतात. त्यासाठी स्थानिक चलनाची गरज नाही. केवळ प्रवेश तिकिटाची नाही तर इतर कोणत्याही प्रकारची खरेदी करायची असेल तरी स्थानिक चालनाची गरज भासत नाही. अगदी रस्त्यावर विक्री करायला बसलेली व्यक्ती देखील अमेरिकन चलनात व्यवहार करते. त्यामुळे कंबोडियाच्या वास्तव्यात आम्हाला स्थानिक चलन वापरावेच लागले नाही. तरीही स्थानिक चलन घ्यायचे झाले तर परिवर्तन दर काय आहे याची माहिती आम्ही कंबोडिया देशात प्रवेश करतानाच मिळविली होती. देश प्रवेशाचे सोपस्कार आटोपून आम्ही जसे आमच्या बसकडे जाऊ लागलो तसे तेथे उभ्या असलेल्या बाईने आम्हाला गाठले. तिच्याकडे स्थानिक चलनाची मोठी चवड होती. एका अमेरिकन डॉलरला ती चाळीस लाख देत होती.

तिकीट देताना त्यावर आपले छायाचित्र छापून देतात. त्यासाठी आपण तिकीट खिडकीजवळ पोहोचताच एका विशिष्ट ठिकाणी उभे राहायला सांगून आपले छायाचित्र घेतात. तेच तिकीटावर छापलेले असते. रांगेत उभे राहताना प्रवेश-तिकीट मिळायला खूप वेळ लागेल असे वाटले होते. परंतु रांग वेगाने पुढे सरकत गेली आणि थोड्याच कालावधीत आमच्या हातात प्रवेश-तिकीट पडले. विजयी मुद्रेने आम्ही टुकटुकवाल्याचा शोध सुरू केला. तो आमच्यावर नजर ठेवूनच असावा. लगेचच तो



**प्रवेश-तिकीटाच्या रांगेत असलेले लोक**

आमच्यापुढे उभा राहिला. त्याच्या वाहनात बसून आम्ही आमच्या पुढच्या प्रवासाला सुरुवात केली. प्रवेशद्वारापासून मंदिराचे अंतर बरेच आहे. घनदाट जंगलातून तिथे पोहोचावे लागते. जंगलातील रस्ते चांगल्या अवस्थेत असून जागोजागी माहिती देण्यासाठी फलक लावण्यात आलेले आहेत. साधारणपणे १० मिनिटांनी आम्ही मुख्य मंदिराजवळ पोहोचलो. आमच्या टुकटुक चालकाने आम्हाला उतरण्याची सूचना केली आणि दुसऱ्या बाजूला भेटू असे सांगितले. त्याचा निरोप घेऊन आम्ही मंदिराच्या दिशेने चालू लागलो. मंदिर-संकुलाची रचना अशी आहे की, त्याच्या चोहीकडे खंदक असून त्यात पाणी भरलेले आहे. ते पार करण्यासाठी जागोजागी पूल बांधलेले आहेत. जुन्या काळात बांधलेल्या या पुलांची पडझड झाली आहे. काही ठिकाणी तात्पुरती डागडुजी केली आहे. तरीही त्यावरून चालत जाताना मनात धस्सऽऽ होते. अनेक लोक पुलावरून सावकाश पावले टाकत चालले होते. त्यांच्या मागोमाग आम्हीही मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचलो. प्रवेशद्वारापासून आत गेल्यावर पुढे एक भव्य मंदिर आमच्या नजरेस पडले. ते विष्णू मंदिर होते.



**भव्य विष्णू मंदिर**

कंबोडिया देशातील लोकांवर हिंदू संस्कृतीचा फारच मोठा प्रभाव आहे. अनेक वर्षे तेथे हिंदू राजांचे राज्य होते. त्यांनी या मंदिरांची निर्मिती केली आहे. कालांतराने तेथे बौद्ध धर्माचा प्रसार झाला. त्यामुळे ही मंदिरे आता बौद्ध धर्मीय लोकांच्या ताब्यात आहेत. बऱ्याच ठिकाणी मंदिरात बुद्ध मूर्ती स्थापन करण्यात आलेल्या आहेत. आम्ही ज्या विष्णू मंदिरात गेलो होतो त्या मंदिरात देखील उभ्या विष्णू मूर्तीजवळ आडव्या अवस्थेत असलेला बुद्धाचा पुतळा आम्हाला पाहायला मिळाला. मंदिराची रचना वैशिष्ट्ययपूर्ण अशीच आहे. मंदिराचे प्रवेशद्वार पश्चिमेला आहे. साधारणपणे हिंदू मंदिरांचे प्रवेशद्वार पूर्वेला असते. या मंदिरांचे द्वार उलट दिशेला का असावे असा प्रश्न उपस्थित होतो. याचे कारण असे की, या मंदिर परिसरात राजघराण्यातील प्रेते पुरता यावीत अशी योजना होती. या मंदिरांचे बांधकाम राजा रविवर्मन यांनी सुरू केले. आपल्या मरणानंतर आपले पार्थिव याच मंदिर परिसरात चिरनिद्रेसाठी ठेवले जावे अशी त्यांची इच्छा होती. परंतु मंदिर पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांची अंतिम इच्छा पूर्ण झाली नाही. त्यानंतरच्या पिढ्यांनी त्यांची प्रेते येथे पुरली अथवा नाही याची माहिती उपलब्ध झाली नाही.

मंदिर अतिशय भव्य असे आहे. जसजसे आपण जवळ जातो तसतसे मंदिराची भव्यता आपल्याला लक्षात येते. मेरू पर्वतासारखी या मंदिरांची रचना आहे. मंदिराला पाच मनोरे आहेत, चार कोपऱ्याला चार आणि मध्यभागी एक. या मंदिरांच्या शेजारच्या जलाशयात सुंदर असे प्रतिबिंब दिसते. ते प्रतिबिंब कॅमेऱ्यात टिपण्यासाठी अनेक



नव्याने उभारलेली (आडवी) बुद्ध मूर्ती

जण कठड्यावरून खाली उतरले. आम्ही देखील खाली जाऊन मंदिराचे प्रतिबिंब दिसेल अशी छायाचित्रे काढून घेतली. त्यातील एक चित्र खाली दिले आहे. सिम रेप च्या विमानतळावर हेच चित्र मोठ्या आकारात लावलेले होते. माहितीच्या महाजालात देखील या मंदिरांची अनेक प्रकारची छायाचित्रे उपलब्ध आहेत.



**विष्णू मंदिराचे पाण्यातील प्रतिबिम्ब**

विष्णू मंदिराचे दर्शन करून झाल्यावर आम्ही मागच्या भागात चालत गेलो. तिथे आमचा टुकटुक चालक आमची वाट पाहत होता. त्याने आम्हाला पुढच्या मंदिराकडे नेले. त्याचे नाव 'ता प्रोम' असे होते. इतर मंदिराप्रमाणे हे मंदिर देखील प्रवेशद्वारापासून बरेच दूर आहे. मंदिराच्या जवळ जावे तसे आपल्या दृष्टीस पडते ते मंदिरातून उंच वाढलेले झाड. या झाडांची मुळे मंदिराच्या भिंतीत गेल्यामुळे बरीच पडझड झाली आहे. मंदिराच्या आजूबाजूला देखील अनेक दगड पडलेले दिसतात.



**ता प्रोम मंदिर**

अनेक ठिकाणी दुरुस्तीचे काम चालू आहे. काही भिंती त्याच्या मूळ रूपात आणलेल्या आढळल्या. काही

ठिकाणी तर मंदिर आताच बांधले आहे की काय असे वाटते. एवढ्या बेमालूमपणे दुरूस्तीचे काम केलेले आहे. ते पाहून आम्ही कंबोडिया सरकारचे कौतुक करणार तेवढ्यात आमची नजर हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषांत लिहिलेल्या फलकावर पडली. हा फलक भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाने लावला असून त्या फलकावर लिहिले होते की, भारत सरकारच्या पुढाकाराने ता प्रोम या मंदिरांच्या दुरुस्तीचे काम चालू आहे. हा फलक वाचून आणि दुरुस्तीचे काम पाहून आम्हाला आमच्या देशातील पुरातत्त्व विभागाचा अभिमान वाटू लागला. भारतामध्ये अनेक जुन्या स्थळांची दुर्दशा पाहून मी या विभागाला अनेकदा दूषणे दिलेली आहेत. परंतु त्याच विभागाचे एवढे चांगले काम पाहून माझ्या तोंडून नकळतपणे कौतुकाचे शब्द बाहेर पडले. तेथे बरीच भारतीय माणसे काम करीत होती. त्यापैकी एका व्यक्तीशी बोलण्याची आम्हाला संधी मिळाली. त्याच्याकडून आम्हाला कळले की, युनेस्को या संस्थेने मंदिर दुरुस्तीच्या कामात पुढाकार घेतला. इसवी सन १९९२ मध्ये युनेस्को या स्थळाला ‘जागतिक वारसा ठिकाण’ असा दर्जा दिला. त्यानंतर त्याची देखभाल करण्याकडे लक्ष पुरवायला सुरुवात केली. कंबोडिया सरकारला मंदिर दुरुस्तीचा खर्च परवडणार नाही हे ओळखून युनेस्कोने इतर देशांना मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला भारत सरकारने सर्वात प्रथम प्रतिसाद दिला आणि फारसा गाजावाजा न करता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली. हे काम त्यांनी एवढ्या बेमालूमपणे केले की, नवीन कोणते आणि जुने कोणते हे ओळखणे कठीण झाले. जेथे शक्य असेल तेथे त्यांनी जुने दगड लावले. जेथे जुना दगड सापडला नाही किंवा त्याची खूप झीज झाली त्या ठिकाणी त्यांनी नवीन दगड बसविला. दगडावरची कलाकुसर तंतोतंत जुळेल अशी त्यानी काळजी घेतली असल्याचे जाणवले. भारतीय मंदिरांची देखभाल करण्याचा भारतीय पुरातत्त्व विभागाला चांगला अनुभव आहेच. या दुरुस्तीच्या कामी त्या अनुभवाचा त्याना खूप उपयोग झाला.




**भारत कम्बोडिया सहकार्य परियोजनेची माहिती देणारा फलक**

युनेस्कोने केलेल्या आवाहनाला भारताप्रमाणेच चीनने देखील प्रतिसाद दिला आणि संकुलातील काही मंदिरांच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले. १९८८ ला कामाची सुरुवात करून सलग २० वर्षे त्यांनी दोन मंदिरांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण केले. ही दोन्ही मंदिरे रस्त्याच्या दोन बाजूला आहेत. चिनी कारागिरांनी देखील दुरुस्तीचे काम चांगले केले आहे. त्याचबरोबर केलेल्या कामाची जाहिरात करण्यासाठी एक प्रदर्शन भरविले आहे. या प्रदर्शनात दुरुस्ती करण्याच्या आधीचे आणि दुरुस्ती केल्यानंतरची मंदिरांची छायाचित्रे दाखविली आहेत. त्याचबरोबर दुरुस्तीचे काम कोणकोणत्या टप्प्यांतून गेले यांच्या पायऱ्या उलगडून दाखविल्या आहेत. या कामात त्यांना त्यांच्या विद्यापीठातील अनेक विभागातील प्राध्यापकांची मदत घ्यावी लागली असे त्यानी नमूद करून ठेवले आहे. हे प्रदर्शन पाहून मंदिर दुरुस्तीचे काम किती जिकीरीचे होते याची आपल्याला कल्पना येते. या कामात केवळ पुरातत्त्व विभागच नाही तर इतर अनेक विभाग एकत्रितपणे काम करीत असतात याची जाणीव आपल्याला या प्रदर्शनावरून येते. चीन सरकार आणखी एका मंदिराच्या दुरुस्तीचे काम करीत आहे. तेथे देखील चीन पुरातत्त्व विभागाने एक मोठा फलक लावून ठेवलेला आढळला. हे पाहून आपल्या कामाची जाहिरात करण्यात आपण भारतीय कमी पडतो असे वाटल्यावाचून राहिले नाही.

---

आयुष्यात सगळ्याच गोष्टी आपल्याला जमतील असं नाही.




माहितीपूर्ण प्रदर्शन

आता चीन सरकार टाकियो मंदिराच्या दुरुस्तीचे काम करीत आहे. हे मंदिर बरेच मोठे असून खूप उंच आहे. पुढच्या बाजूने दुरुस्तीचे काम सुरू असल्याने मागच्या बाजूने जाण्याची तात्पुरती सोय केली आहे.



टाकिओ मंदिराचा जिर्णोद्धार




चिनी सरकारच्या वतीने लावण्यात आलेला फलक

टाकिओ मंदिराचे दर्शन घेऊन आम्ही परत टुकटुक कडे आलो. त्यानी आम्हाला एका छोट्या दारातून बाहेर आणले. तेथे दोन मंदिरे आहेत. दिवसभर फिरून थकल्यामुळे त्यापैकी एका मंदिराकडे आम्ही दुर्लक्ष केले. दुसरे मंदिर मात्र टाळण्यासारखे नव्हते. त्याचे नाव ‘बयोन मंदिर’ असे आहे.



प्रसिद्ध बयोन मंदिर



मंदिराच्या दगडावर असलेली कलाकुसर

या मंदिरांची रचना वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे. मंदिरातील दगडांना असा आकार दिला आहे की दुरून पाहिले की माणसाचा चेहरा दिसतो. मंदिराच्या गाभाऱ्यात पोहोचायला अनेक पायऱ्या चढाव्या लागतात. वरून आजूबाजूचा परिसर मनमोहक दिसतो. या ठिकाणी आम्ही अनेक छायाचित्रे घेतली.

(पृष्ठ क्र.२१ वर)

# स्वदेशवेध-२
# सिक्कीम (भाग-१)

*सिक्कीम-दार्जिलिंग शहरांचे व लगतच्या परिसराचे प्रवासवर्णन करणारा लेख दोन भागात प्रसिद्ध करीत आहोत*
*- संपादक*

१७ मार्च २०१० ते २६ मार्च २०१० दरम्यान नऊ रात्री आणि दहा दिवसांची सिक्कीम-दार्जिलिंग सहल सचिन ट्रॅव्हल्ससोबत आम्ही अनुभवली. त्या प्रवासाचे हे वर्णन आहे. होतकरू प्रवाशांनी काय पाहावे याचा अंदाज आला आणि कधीच तिथे न गेलेल्या व न जाऊ शकणाऱ्याना तिथे काय खास आहे ते समजले, तर या प्रवासवर्णन लिहिण्याचे सार्थक झाले असे मी समजेन.

सिक्कीम राज्य १९७५ मधे भारतीय संघराज्याचा घटक झाले. ईशान्य भारताच्या सात राज्यांत, देवतात्मा हिमालयाच्या शिवालीक टेकड्यांच्या परिसरात वसलेल्या या पर्वतीय राज्याची, आठवे राज्य म्हणून भर पडली. सिक्कीम राज्यात विमानतळच काय, पण रेल्वेस्थानकही नाही. त्यामुळे दूरवरून या राज्यात सहलीस यायचे झाल्यास, पश्चिम बंगाल राज्यातील नजिकचे विमानतळ बागडोगरा अथवा पश्चिम बंगाल राज्यातील नजिकचे रेल्वेस्थानक न्यू-जल-पैगुडी यांचाच मार्ग धरावा लागतो. ही दोन्ही ठिकाणे दार्जिलिंग जिल्ह्यात आहेत. पश्चिम बंगाल राज्याच्या दार्जिलिंग जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय सिलिगुडी शहरात आहे.

सुरवातीसच मी तक्ता गान्तोकच्या हवामानकेंद्राच्या संकेतस्थळावरून मिळवला होता. त्यावरून मार्च महिन्यात आम्हाला मानवणारे तापमान असल्यामुळे मार्च महिन्यातच सहल करण्याचे नक्की केले. सगळ्यात कळीचे आरक्षण कोलकाता ते एनजेपी आणि परत हेच असल्याने प्रथम ते स्वतःच करून घेतले. नंतर सचिनसोबत सहल नोंदवली. त्यानंतर विमानाच्या प्रवासाचेही आरक्षण करून टाकले. सिक्कीमची राजधानी गान्तोक शहर. आम्ही मुंबईच्या समुद्रसपाटीवरून निघून ६,६०० फूट उंचीवर दार्जिलिंगला पोहोचलो; एनजेपी-मिरीक-(५५)-दार्जिलिंग-(४५)-कॉलिंपाँग-(५१)-गान्तोक-(७७)-नातूला-(५६)-गान्तोक-(५६)-एनजेपी-(१२४), असा जवळपास ४५४-किमीचा पर्वतीय प्रदेशातील बसप्रवास केला; १४,२०० फूट उंचीवरील नातूला इथे भेट दिली आणि पुन्हा समुद्रसपाटीवर परत आलो. मुंबईच्या ३७ अंश सेल्शस पासून नातूला इथल्या -४ अंश सेल्शस तापमानापर्यंत जाऊन आलो. आजचे सिक्कीम राज्य ७,३०० वर्ग किलोमीटर भू-भागावर विस्तारलेले असून लोकसंख्या सुमारे साडेपाच लाख आहे. पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण अशा चार जिल्ह्यांमधे ते विभागलेले आहे. पूर्व जिल्ह्याचे मुख्यालय तसेच संपूर्ण राज्याची राजधानी गान्तोक आहे. उत्तर जिल्हा क्षेत्रफळाने सर्वात

**गान्तोक हवामान तक्ता**

| | जा | फे | मा | ए | मे | जू | जु | ऑ | स | ऑ | नो | डि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सरासरी कमाल तापमान (अंश से) | १२ | १४ | १८ | २१ | २२ | २२ | २२ | २२ | २२ | २१ | १८ | १४ |
| सरासरी किमान तापमान (अंश से) | ४ | ५ | ९ | ११ | १३ | १६ | १७ | १६ | १५ | १२ | ९ | ५ |
| सरासरी पाऊस (मिलीमीटर) | ३१ | ७९ | ११६ | २८९ | ५५३ | ६०३ | ६५० | ५७४ | ४८८ | १८१ | ४० | २३ |

स्रोत: हवामानकेंद्र, गान्तोक

ज्या गोष्टींशी आपला काहीही संबंध नाही त्यात नाक खुपसले की तोटाच होतो.

मोठा असून त्याचे मुख्यालय मंगन इथे आहे. पश्चिम सिक्कीम जिल्ह्याचे मुख्यालय गेयझिंग इथे आहे; तर दक्षिण सिक्कीम जिल्ह्याचे मुख्यालय नामची येथे आहे; भुतिया भाषेत 'नाम' म्हणजे 'आकाश' आणि 'ची' म्हणजे उंच. म्हणून नामची म्हणजे 'उंच आकाश.' नामची येथे रिंपोचे यांची ३६ मीटर (१२० फूट) उंचीची जगातील सर्वात भव्य मूर्ती आहे.

हे क्षेत्र पर्वतीय प्रदेशात वसलेले असल्याने इथे प्रवासास किती वेळ लागेल याचे गणित अंतराच्या अंदाजावरून काढता येत नाही. उदाहरणार्थ, सिलिगुडी ते गान्तोक अंतर ११० किलोमीटर आहे. आपल्या मैदानी प्रदेशातील अंदाजानुसार आपण सहज समजू की फार तर फार तीन तास लागतील. प्रत्यक्षात या प्रवासाला सहा तास लागतात. दुसरे म्हणजे, नकाशात सरळसोट दिसणारी अंतरे प्रत्यक्षात वळणावळणांनीच साध्य होणारी असतात. उदाहरणार्थ, दार्जिलिंगहून गान्तोक नकाशात दिसणारे अंतर प्रत्यक्षात दार्जिलिंग-कॉलिंपाँग-गान्तोक असेच जावे लागत असल्याने बरेच जास्त पडते. कारण प्रत्येक गाव एका पर्वतराशीवरील एका टेकडीवर वसलेले असते. ती टेकडी, तो पर्वत उतरून खाली यायचे, नदीच्या काठाकाठाने पुलापर्यंत प्रवास करायचा (पूलही जागोजागी बांधलेले आढळत नाहीत. कुठेतरी स्थानिकांच्या सोयीने बांधलेले मोठे पूलच दीर्घ पल्ल्याच्या प्रवासाकरताही वापरावे लागतात). पुन्हा नदीच्या काठाकाठाने पूर्वस्थळावर पोहोचायचे आणि मग दुसऱ्या तीरावरला पर्वत चढू लागायचे, त्यावरली ईप्सित टेकडी गाठायची आणि घाटरस्त्याने गंतव्यस्थळी पोहोचायचे.

हिमालयन शिवालीक पर्वतराशींच्या पट्टीतील रंगीत आणि तिस्ता या दोन नद्यांच्या खोऱ्यात (खरे तर पाणलोट क्षेत्रात) हल्लीचे सिक्कीम वसलेले आहे. तिस्ता हा त्रिस्था या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा. तिस्ता नदी पूर्वी तीन प्रवाहांद्वारे दक्षिणेकडे वाहत असे. पूर्वेला करतोया, पश्चिमेला पुनर्भवा आणि मध्यभागी आत्रेई. पुनर्भवा पुढे महानंदेला मिळाली. आत्रेई एका चिखल-पाणथळ-स्वरूपी जागेतून वाहत वाहत करतोयेस मिळाली व मग पुढे वाहत वाहत जफरगंज नजीक पद्मा नदीस मिळाली. १७८७ च्या विध्वंसक पुरानंतर, तिस्ता पुन्हा जुन्या प्रवाहास लागून आग्नेयेस वाहत वाहत ब्रह्मपुत्रेस मिळाली. नदीला नेपाळी भाषेत 'खोला' म्हणत असल्याने तिला 'तिस्ताखोला' असेही म्हणतात. येत्या दहा वर्षांत एकूण ५०,००० मेगॉवॉट क्षमतेचे छोटेछोटे जलविद्युत प्रकल्प या नदीवर होणार आहेत. या माहितीवरून तिच्या ऊर्जस्वल प्रवाहाची कल्पना करता येईल. रंगीत नदी जोरेथाँग, पेलिंग, लेग्शिप मार्गे वाहत वाहत तिस्ता बाजार येथे तिस्ता नदीस मिळते. हिचा प्रवाह फारच खळबळजनक असल्याने ही तराफा-तरण-कर्त्यांच्या (राफ्टींग) फारच आवडीची आहे. या नदीवर राष्ट्रीय जलविद्युत निगमाचे ६० मेगॉवॉट क्षमतेचे विद्युत संयंत्र बसवलेले आहे.

गान्तोक शहर उंच पर्वतात समुद्र सपाटीपासून ६,००० फूट उंचीवर वसलेले आहे. तरीही अद्ययावत सुखसोयींनी सुसज्ज आहे. गान्तोकचे ऊर्जा-उद्यान संपूर्णतः सौर ऊर्जेवर संचालित आहे. तिथे सौर ऊर्जेला सामान्य जीवनात कसे उपयोगात आणता येईल याचे उत्तम मार्गदर्शन प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे साकार केलेले आहे. सिक्कीम राज्याने पर्यटन-स्नेही धोरण स्वीकारलेले आहे. समुद्रसपाटीपासून १४,२०० फूट उंचीवरील 'नातूला' म्हणजे 'ऐकत्या कानांची खिंड', या अति-अंतरंगातील, किंबहुना चीन सीमेवरील पुरातन रेशीममार्गातील खिंडीपर्यंतही पर्यटकांना जाण्यास अनुमती देतात.

१९ मार्च २०१० ला सकाळी ८ वाजता आम्ही न्यू जलपैगुडी स्थानकावर उतरलो. स्थानकाबाहेर सुमोंमधे सामान लादून आम्ही हॉटेल सेंट्रल प्लाझा, सिलिगुडी येथे गेलो. नास्ता केला आणि मिरीकच्या दिशेने प्रयाण केले. हवामान काहीसे थंड होते. उत्साहवर्धक. वाटेत आम्ही एका चहाच्या मळ्यात उतरलो.

---

जेव्हा संतोषरूपी धन तुम्हाला प्राप्त होते तेव्हा इतर गोष्टी कचऱ्याप्रमाणे तुच्छ वाटतात. - संत तुलसीदास

घातधर्मी वळणाच्या (लॉगरिदमिक) निमुळत्या टोपल्यांतून चहाची पाने खुडून आणणारे मजूर (स्त्रिया आणि पुरुषही) आपापल्या टोपल्या एका लहानशा लांबुळक्या छपरीमधे अंथरलेल्या मच्छरदाणीच्या कापडावर रिकाम्या करत होते. मग ताणकाट्याच्या साहाय्याने वजन करून त्यांची बोचकी बांधली जात होती. तिथे उतरून आम्ही जेमतेम गुडघ्यापावेतो उंच असणाऱ्या चहाच्या झुडुपांतून फेरफटका करत होतो. मग तिथून निघून आम्ही यथावकाश जेवायच्या वेळेपावेतो हॉटेल जगजीत, मिरीक इथे येऊन पोहोचलो. जेवलो. थोडीशी विश्रांती घेऊन फेरफटका मारण्याकरता तयार झालो. असे कळले की मिरीकमधे एक तलाव पाहण्यासारखा आहे. तिथे बोटिंगही करता येते. ते पाच वाजता बंद होते. तसेच एक बुद्ध मठही आहे. मात्र तोही संध्याकाळी पाच वाजता पर्यटकांसाठी बंद करतात.

तेव्हा प्रथम तलावावर जाण्याचा निर्णय झाला. तलाव ऐटदार होता. पाणी स्वच्छ होते. नयनमनोहर आणि देखण्या देखाव्यात तो शोभून दिसत होता. चार जणांच्या पायडलिंग करून चालवण्याच्या बोटीस अर्ध्या तासाचे चाळीस रुपये घेत होते. शिवाय मार्गदर्शक सोबत घेतल्यास वीस रुपये जास्तीचे. आम्ही आठ जण होतो. पैसे भरून दोन बोटी ताब्यात घेतल्या. मार्गदर्शकही घेतले. वातावरण काहीसे गारच असल्याने परिश्रम जाणवत नव्हते. साधारण अर्धा तलाव पार होत होता, तेवढ्यात आमचा मार्गदर्शक म्हणाला की, पलीकडल्या तीरावर जो उत्सव सुरू असलेला दिसत आहे, तो देवीच्या नवरात्रीनिमित्त होणारा देवीभागवताच्या समारोपाचा आहे. वर डोंगरावर देवीचे मंदिर आहे. तुम्हाला जायचे असेल तर तलावावरील पुलावरून जाऊन पाहून येऊ शकता.

मी त्याला विचारले की,'हीच बोट आपण पलीकडच्या किनाऱ्यावर उभी करू. आम्ही दहा मिनिटांत देवीचे दर्शन घेऊन येतो. तू इथेच थांबून राहा. आम्ही परत आल्यावर मग परत जाऊ. असे करता येईल का?' तो तयार झाला. मग आम्ही दुसऱ्या बोटीवर फोन करून विचारणा केली. तिच्यावरचा मार्गदर्शक तयार होईना. तो म्हणू लागला की, 'आपण वेळेच्या आत परतू शकणार नाही, दंड होईल.' त्याला कसाबसा तयार केला. आम्ही दुसऱ्या किनाऱ्यावर उतरलो. वर देवीचे दर्शन घेऊन आलो. त्याच्याही वर काही पायऱ्या होत्या तिथे एक दत्तासारखी मूर्ती दिसली. तिला चार हात होते. मस्तक मात्र एकच. पाठीमागे गाय होती. परतताना आमच्या मार्गदर्शकास विचारले तर तो म्हणाला की ती मूर्ती शिवाची आहे. त्याच्या पाठीमागे नंदी आहे. माझ्या आठवणीत मात्र नंदी कायमच शिवासमोर उभा राहत असे. दत्ताच्या पाठीमागे गाय (कामधेनू) उभी असते त्याप्रमाणे शिवाच्या पाठीमागे नंदी उभा आहे, अशी ही एक आगळी वेगळी मूर्ती आम्ही इथे पाहिली होती. आम्ही नौकानयनतळावर परतलो तेव्हा तासभर उलटून गेलेला होता. म्हणून आमच्याकडून दंड म्हणून चाळीस रुपये प्रती नाव, जास्तीचे वसूल करण्यात आले. आम्हाला मिळालेल्या अनुभूतीच्या मानाने त्या दंडास आम्ही अगदीच क्षुल्लक दंड समजून लगेचच भरून टाकला. मग आमच्यापैकी काहींनी घोडेस्वारीचा आनंद घेतला. त्यानंतर आम्ही हॉटेलला परतलो.

परतताना तळ्याच्या पाळीवर नेहमीच दिसणाऱ्या खाद्यपदार्थांच्या हातगाड्या, टपऱ्या इत्यादी दिसू लागल्या. मात्र त्यातले खाद्यपदार्थही वेगळेच होते. विशेष लक्ष वेधून घेतले ते मोमोंनी. 'मोमो' म्हणजे आपण करतो तसे उकडीचे मोदक किंवा करंज्या. मात्र त्यात सारण भरतात ते भाजीचे. भाजी असते स्क्वॅश नावाच्या फळांची.



**मोमो आणि स्क्वॅश**

तांबड्या भोपळ्यासारख्या दिसणाऱ्या स्क्वॅशच्या भाजीची चव तिखट आणि रुचकर असते. खाण्याची इच्छा अनिवार होत होती. पण सहल नुकतीच कुठे सुरू होत होती. अशात, हातगाडीवरचे खाल्लेले पचेल न पचेल अशा शंकेमुळे, केवळ फोटोच काय ते काढले. मोमो मांसाहारीही असतात. त्याचप्रमाणे मोदक व करंज्यांसारखेच त्यांचे उकडलेले आणि तळलेले असे दोन्हीही प्रकार पुढे पाहण्यात (आणि हो, खाण्यातही) आले. मात्र मोदकासारखा गोड मोमो काही सिक्कीमभर कुठेही दिसला नाही.

हॉटेलपासून दुसऱ्या दिशेला बौद्ध मठ होता. पाच वाजून गेलेले होते. सूर्य मावळतीला आलेला होता. मठातून परतलेले लोक आम्हाला भेटत होते. डोंगरावर चढून जाऊन पंधरावीस मिनिटांत तिथे पोहोचता येते. मठ बंद झालेला असल्यास, 'मुंबईहून आलो आहोत' असे सांगितल्यास, उघडूनही दाखवतात असे कळले. म्हणून मग वर जाण्याचा निर्णय झाला. ज्यांना कंटाळा आलेला होता ते थांबले. आमच्यातील उत्साही लोक पुढे झाले. आम्ही त्यांच्या पाठी निघालो.

डोंगरावर चढून जायला मजा आली. मठ बंद झालेलाच होता. तरीही एका प्रमुख भिख्खूंना विनंती केल्यावर त्यांनी आम्हाला तो पाहण्यास खुला करून दिला. इथले मठ हे, प्रामुख्याने धर्मप्रसाराच्या गुरूकुल पद्धतीने चालणाऱ्या शाळाच असतात. मुख्य सभागृहात प्रवेश करताच समोरच्या बाजूच्या भिंतीलगत बुद्धाची मूर्ती. सोन्याची वाटावी अशी पिवळ्या धमक रंगाची. मूर्तीसमोर सात (आईस्क्रीमचे कप वाटावेत अशा) भांड्यांमधे पाणी ठेवलेले असते. तेलाचे दिवे तेवत असतात. सर्वत्र कमालीची स्वच्छता, टापटीप, नीरव शांतता आणि पावित्र्य. मूर्तीसमोर शे-दोनशे लोकांना आडव्या-उभ्या ओळींच्या सारणीत व्यवस्थित बसता यावे अशी जागा. प्रत्येकाला स्वतंत्रपणे मांडी घालून, जमिनीवर, बुद्धमूर्तीकडे तोंड करून बसता येईल एवढी जागा. प्रत्येकासमोर प्राथमिक शाळेत शोभतील असे उतरते चौरंग मांडलेले असतात. समोर विद्यार्थी आणि बुद्धमूर्ती यांच्यामधे गुरू उभे राहून शिकवू शकतील अशी विस्तीर्ण जागा. चहुबाजूंच्या भिंतींवर बुद्धाच्या जातककथांमधील प्रसंग चित्रित केलेले दिसून येतात. आम्ही गेलो ती वेळ संध्याकाळची असल्याने सर्व दालन रिकामेच होते. आम्ही बुद्धं शरणं गच्छामी, धम्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामी असा मंत्र म्हटला आणि भारलेल्या मनाने मठाचा निरोप घेतला. मठाच्या पाठीमागच्या दरवाजातून मिरीक तळ्याचे दृश्य सुंदर दिसत होते.

२० मार्चला आम्ही मिरीकहून निघालो ते दार्जिलिंगकडे. दार्जिलिंग म्हटल्यावर पहिल्यांदा आठवतात ते चहाचे मळे. बसमधून वळणदार घाटमार्गाने चालत असता दुतर्फा चहाचेच मळे सर्वत्र दिसत होते. आम्ही पोहोचण्याच्या आधी तीन दिवस सतत दार्जिलिंगला पाऊस पडत होता. आज मात्र स्वच्छ सूर्यप्रकाशात, नुकत्याच झालेल्या पावसाने सतेज झालेले चहाचे मळे प्रसन्न वाटत होते. थोड्याच वेळात दार्जिलिंगकडे प्रवास करत आम्ही एका डोंगर-उतारावरील चहाच्या मळ्यातच उतरलो. खूप फोटो काढले. मात्र न छाटता वाढू दिले तर ५० फूट उंच वाढू शकणारा चहाचा वृक्ष, तोडणीस सोपा व्हावा म्हणून, कमरेहून अधिक उंच वाढूच देत नाहीत हे कळून चहाकरता दुःख झाले.





**हे छान चहाचे मळे किती । रेखले चित्र टेकडीवरती ॥**

त्यानंतर आम्ही टॉय-ट्रेनच्या दर्शनार्थ घूम स्थानकापाशी जाऊन पोहोचलो. एक गोड मुलगी पारंपरिक पोशाखात नटून इकडे-तिकडे मजेत फिरतांना दिसली. मग तिथेच एका पाटीवर ती टॉय-ट्रेन जागतिक-सांस्कृतिक ठेवा असल्याची जाणीव करून देणारी जाहिरात पाहिली.

मेरो सपना की रानी कहिले आउंछो तिमि ।
मेरो सपना को महल कहिले बनाउंछो तिमि ॥ म्हणजे,-

माझे स्वप्नांचे राणी सांग येशील तू कधी? ।
माझ्या स्वप्नाचा महाल सांग बांधू मी कधी? ॥

दार्जिलिंगची हिमालयन रेल्वे हे अभियांत्रिकी कौशल्याचे एक चिरंतन स्मारक आहे. इसवी सनाच्या १८७९ मधे घातलेल्या रुळांवरून आजही ती दिमाखात धावत असते. तिला विश्व-सांस्कृतिक-वारसा असण्याचा सन्मान प्राप्त झालेला आहे. दार्जिलिंग शहरात उंचीवरच्या स्थानकांपर्यंत पोहोचण्याकरता आगगाडी जेव्हा इंग्रजी आठच्या आकाराच्या लोहमार्गांवरून वेगाने जात असते तेव्हा ती अत्यंत प्रेक्षणीय भासते. तिचा डौल तो काय वर्णावा! दार्जिलिंग शहरात तिची 'दार्जिलिंग' आणि 'घूम' ही स्थानके आम्ही थांबून पाहिली. दार्जिलिंग हे अंतिम स्थानक आहे. या लोहमार्गासोबतच डांबरी सडकही हातात हात घालून चालत असते. याचाच उपयोग 'आराधना' सिनेमातील सदाबहार गीतात करून घेतलेला आहे. जीपने प्रवास करणाऱ्या राजेश खन्नावर चित्रित करण्यात आलेले 'मेरे सपनों की रानी कब आयेगी तू, बीत जाये जिंदगानी कब आयेगी तू' हे गीत, याच गाडीत बसून प्रवास करणाऱ्या शर्मिला टागोरला उद्देशून म्हटले गेलेले आहे. त्याची चित्रफीत पाहिल्यासही या रेल्वेची खरीखुरी गंमत लक्षात येऊ शकेल. त्याकरता अगदी दार्जिलिंगला जायलाच हवे असे नाही.

जवळच 'गोर्खा-वॉर-मेमोरिअल' म्हणजेच गुरखा-युद्धाचे-स्मारक आहे. १८१४ ते १८१६ दरम्यान, नेपाळ आणि ब्रिटिश-ईस्ट-इंडिया-कंपनी यांच्यात जमिनीवरील सार्वभौमत्त्वावरून झालेल्या घनघोर लढाईत, नेपाळचा दारूण पराभव झाला. सुगौलीच्या तहात तत्कालीन नेपाळची एक तृतियांश जमीन ब्रिटिशांच्या ताब्यात गेली. या लढाईत मारल्या गेलेल्या ब्रिटिश (खरेतर एतद्देशीयच) सैनिकांचे स्मारक घूम रेल्वेस्थानकाच्या बाजूलाच उभारलेले आहे.

संध्याकाळी सातच्या सुमारास आम्ही दार्जिलिंगच्या हॉटेल आनंद पॅलेसमधे जाऊन पोहोचलो. तिथे प्रत्येकास रेशमाचे उत्तरीय घालून आमचे स्वागत करण्यात आले. असे सांगण्यात आले की, ही दार्जिलिंगची स्वागत करण्याची पारंपरिक पद्धत आहे. आम्हाला ही पद्धत आवडली. त्यानंतर बराच वेळ आम्ही त्या उत्तरीयाशी खेळण्यात घालवला होता. जवळच दार्जिलिंगचा सुप्रसिद्ध मॉल होता. म्हणून, संध्याकाळी दिवे जातात हे माहीत असूनही आम्ही उत्साहाने खरेदीला बाहेर पडलो. गान्तोकला ज्या थंडीचा सामना करावा लागणार होता त्याकरता तयारी म्हणून प्रत्येकानेच कुठे हातमोजे घे, तर कुठे स्वेटर घे असे करत मजेत खरेदी केली.




**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

जे आपले आहेत त्यांच्यावर कुणीही प्रेम करतं; पण जे आपले नाहीत त्यांच्यावर प्रेम करणं हेच खरं प्रेम !

# नर्मदा परिक्रमा

**भाग : २१**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ५९ वा. नामनपूर-टिपरास (दंतुला नदीपार) मिर्जा-फणा, मु. हरिप्रसाद पंडित गृह.**

काल रात्रभर पावसाचा शिडकाव सुरूच होता. सकाळी सात वाजता निघणे अशक्य होते. कारण हवा पूर्ण पावसाळी नव्हे, पण अधेमधे पाऊस होताच.

हातपंपावर स्नान केले. पाणी कोमट होते. आता लवकर निघणे नाही; तेव्हा कन्याभोजन म्हणून कडाई (शिरा) करावी असा विचार जाधव काकांनी मांडला. आपलीही न्याहारी होईल. त्यानंतर उघाडी मिळाली तर पुढला विचार!

दुकानात जाऊन सर्व आवश्यक सामग्री खरेदी केली आणि मैय्याला आवडेल असा सुंदर बेत झाला. भोजनाचा आग्रह होता, पण उघाडी मिळाली तेव्हा निघायचा निर्णय झाला.

तत्पूर्वी सकाळपासून चहाचे आग्रह करणारे त्यांचे शेजारी! त्यांच्याकडे चहापानासाठी गेलो. चहा होईपर्यंत त्यांनी प्रत्येकाचे पाय चेपून दिले. नर्मदे हर!

पुढील प्रत्येक गाव २ ते ५ कि.मी. अंतरावर होते. हवा पावसाळी होती. प्रथमतः उद्देश होता तो दतुनी नदी पार करण्याचा. फतेहगढला जाऊनही लाँचने नदीपार करता येते हे कळले होते. टिपरास नदी नर्मदेला मिळण्यापूर्वी पार करता येते; परंतु डोंगी चालते की बंद आहे याबद्दल संभ्रम होता.

आम्ही टिपरास गाठण्याचे ठरविले. टिपरास गाठणे. नदी दूर होती. अलीकडे शर्मा नावाच्या गृहस्थाने अगत्याने चहा दिला. पुढे एका छोट्या दुकानातून मसाला मागितला तर लिंबाचे लोणचे मिळाले. निःशुल्क.

''सर्वत्र सुखिनःसन्तु मंत्र म्हणून सुख, प्रसन्नता, एकोपा निरामय स्वास्थ्य आणि मैय्याची अशीच सेवा घडो'' असे त्याच्यासाठी मैय्याला सांगितले. तर तो वृद्ध दुकानदार एकदम रडायला लागला. त्याचा मुलगा नीट वागत नाही त्याच्यासाठी मैय्याला सांगा असे म्हणत होता!

व्यक्तिगत दुःखाचा उमाळा अशा तऱ्हेने मोकळा झाला. तो ही आमच्या एका श्लोकाने! आम्ही आतून हलून गेलो. त्याला धीर देऊन पुढे नदीकिनारी गेलो. नाविक आणि तीन माणसे इतकेच जण बसतील अशी छोटी नौका, त्यातून दोन गटात नदी पार केली. (प्रत्येकी १० रु.)



प्रत्येक गाव आम्ही आकाशाकडे पाहात गाठत होतो. पावसाची लक्षणे दिसत होती. आभाळ भरलेले होते. वाटले तर पुढे न जाता आहे त्या गावातच मुक्काम करायचा असे ठरवून पुढे पुढे जात होतो.

सध्या आम्ही सहाजण एकत्र. दुपारचे २ वाजून गेले होते. बरोबर नामनपुरमधून दिलेल्या पोळ्या होत्या. वाटेत लोणचे मिळाले होते. गावाच्या तोंडाशी असलेल्या शाळेच्या कट्ट्यावर बसून भोजन आटोपले.



शिराळे (सेराल्या) गावात मुक्कामाच्या आग्रह झाला. परंतु ५-५॥ पर्यंत चालून कणा गाव गाठावे म्हणून पुढे आलो.

बरोबरचे तिघे पुढे गेले होते. कणा गाव लागले समजून एका चौथऱ्यासमोर असलेल्या घरात मुक्कामाची चौकशी केली तेव्हां उत्तर मिळाले -'झाडाखाली चौथ्यावर!' 'शिराळ्यात का वस्ती केली नाहीत?' हा प्रश्न!

पावसाळी हवा, वाहणारा वारा, थंडी वाढविणारा. अर्थात पुढे निघालो. कणा गावातील मंदिराचा ध्वज दुरून दिसला व हायसे वाटले. ५ वाजले होते. पावसाळी वातावरणामुळे अंधार दाटायला लागला होता.

मंदिराला पराची लावलेल्या दिसल्या. समोरच्या मोठ्या घराबाहेर खाटेवर कुणी वृद्ध बसले होते. 'मंदिरात रहा, काम सुरू असले तरी आत स्वच्छ आहे.'

'कांबळी मिळतील का?'
'सतरंजी मिळेल.'

मरणाची थंडी. 'फक्त सतरंजी मिळेल. मंदिरात थंडी वाजत नाही, आता इतकी थंडी नाही', इत्यादी वाक्ये ऐकून आम्ही काय समजायचे मे समजलो आणि पुढे निघालो.

पुढल्या घरात नकार. (म्हणजे पुढल्या गावात सोय आहे हे उत्तर) कोपऱ्यात एक महिला खाटेवर बसली होती. 'आगे एक नाका है, वह कूद जाओ और राजोरी गावख वहा सब साधन है।'

'अहो, आम्ही आता दमलो आहोत. अंधार पडायला लागला आहे.'

'तो क्या हुआ - यहा नजिक है - एक दो कि. मीटर!'

पुढला रस्ता बोळीसारखा आणि चिखलाने माखलेला!

अखेरचा प्रयत्न म्हणून डाव्या हाताच्या घरात जिथे गाडी उभी होती तिथे विचारणा केली आणि आनंदाने रुकार मिळाला.

घरधनी देवेन्द्र आचार्य या माणसाच्या अनुपस्थितीतही हे विशेष!

चहा, उत्तम भोजन, कांबळी मी मागितली म्हणून; अंगावर घेतलेली शाल जुनी म्हणून बदलून नवी कोरी शाल देवेन्द्र आल्यावर माझ्या अंगावर घातली.

हे कुटुंब फार गरिबीतून वर आलंय. या मुलाला मामाने वाढविले. कुणाकडे (शास्त्रीकडे) तरी हा मुलगा धुणे धुवायची सेवा करे. त्यांनी याला बनारसला पाठविले. तिथे हा मुलगा शिकला आणि आता भागवत कथा चरितार्थासाठी करतो. अत्यंत संस्कारी घर!

आणि सतरंजीशिवाय काही न मिळणारे घर गावातल्या सर्वात श्रीमंताचे होते! नर्मदे हर!!

**दिवस ६० वा. फणा-नेमावर १४ कि.मी. सकाळी ७.१५ ते १३.३०**

पावसाळी हवी, काल रात्री पाऊस पडला नाही, पण दिवसाही सुटी घेईल या विश्वासाने निघालो. थोड्यावेळाने गोगटे त्रिकूट भेटले. आम्ही काल फोन करून कण्यात थांबलो असल्याचे कळविले होते. ते पुढे राजोरी आश्रमात होते.

आश्रमबाबा स्वतः रात्रभर कॉमेन्ट्री ऐकणारे आणि सतत चिलिम धूर काढणारे. बाबा या त्रिकुटावरसारखे आग बरसत होते. 'परिक्रमा नियमानुसार करता येत नाही तर घरी जा!' इ.

कुठल्याही कामाला अंतःकरणाचा उमाळा लागतो.

अशोक जर तिथे असता तर त्याचे बाळाबरोबर भांडण नव्हे तर मारामारीसुद्धा झाली असती. बाबाने चहा, भोजन सुंदर दिले; पण रात्री ४ तास भजन, नंतर रात्रभर लेक्चर!

आम्ही (की बाबा?) वाचलो. नर्मदे हर!

बजवाड्याच्या बरेच अगोदर म्हणजे दावण गावात 'बलराम' यांच्याकडे चहा घेतल्याशिवाय पुढे जाऊ नका, असा निरोप नदी कुदताना (नदी पार करताना) मिळालेला. नदीला (नाल्याला) पाणी नावाला होते. परंतु बूट बुडाले असते. पात्रात पाच-सहा दगड टाकले होते. त्यावरून थोडी सर्कस करत पलीकडे गेलो. बळराम जाट यांचे महाप्रशस्त घर. त्यांचे अगत्य पाहून सर्द झालो. चहा आला, समोर पाण्याचा पम्प जोरात पाणी फेकत होता ते पाहून संमती घेऊन स्नान-कपडे आटोपले. भोजनाचा आग्रह नम्रतेने मोडत, 'बाल भोग' (म्हणजे न्याहारी) चालेल सांगितले.

स्नान आटोपेपर्यंत उत्तम तुपातला शिरा आणि पोहे आले. स्नानोत्तर, वाळत घातलेले कपडे सॅकमध्ये भरून 'सर्वत्र सुखिनः सन्तु' हा आशीर्वादपर मंत्र म्हणून पुढे निघालो.

कालपासून शेतीला वीज नाही कारण तार तुटली आहे. जाट साहेबांनी फोन लावला तर उत्तर मिळाले की, गावातल्या सर्वांनी थकबाकी भरल्याशिवाय वीज चालू होणार नाही. जगदीश जाटाने (मोठ्या आवाजात) त्याला शिव्यांची लाखोली वाहिली आणि सांगितले की, माझी थकबाकी नसताना मला वीज का जोडून मिळणार नाही?

मुख्यमंत्र्याला सांगून तुझी करूनच टाकतो असा सज्जड दमही दिला. नंतर आणि कुठे कुठे फोन लावले.

तर्कवाद बरोबर असला नसला तरी जी मजुरी आणि असभ्य भाषा पाहिली तेव्हा कळले की 'क्राइम पेट्रोल' मध्ये ग्रामपंचायती कशा वागतात त्याचे यथार्थ दर्शन असते.

बजवाड्याला पाऊस शिंतडला. अर्धा तास थांबला. उघाडी पडली. पुढे निघालो. तत्पूर्वी 'सर्वत्र सुखिनः सन्तु' चहा मिळाला.

१॥ च्या सुमारास नेमावर गाठले. बूट शिवणे, सॅक शिवणे इ. कामे वझे दांपत्याने करून घेतली. सिद्धश्वराचे अप्रतिम मंदिर पाहिले. बाहेरच (बूट काढायचे नसल्याने) शिवमहिम्न म्हटले.

एका शर्मा भोजनालयात गरम पोळ्या, भाजी, वरण, उसळ असे स्वादिष्ट भोजन घेतले.

४। वाजले होते. त्रिकुटाने ब्रह्मचारी आश्रमात आश्रय घेतला होता. इथे-तिथे पाहणी करून आम्हीही तिथेच आसने लावली.



मी सिश्वेश्वर मंदिरात गेलो. दर्शन घेतले. पुन्हा शिवमहिमा 'संस्कृत आणि मराठी' म्हटले व परतलो.

आश्रमात फार छान वागणूक मिळाली. भोजन फारच रुचकर होते.

नर्मदे हर!!

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# लोकसंख्या आणि सवयी

*नागरिकांच्या चुकीच्या सवयींमुळे अस्वच्छता कशी निर्माण होते हे या लेखात विशद केले आहे - संपादक*

एक नामवंत बँक. पासबुक भरण्याचे स्वयंचलित यंत्र नादुरुस्त झाल्यामुळे वैतागलेल्या तीस चाळीस खातेदारांची बँक कारकूनापुढे प्रचंड रांग. खातेदारांचे क्रोधित उद्‌गार.

''सगळी शोभेची यंत्रे''

''तंत्रज्ञ म्हणतोय ही दुरुस्त होणार नाहीत.''

''पैशाचा चुथडा''

''सगळीकडे हेच आहे. रेल्वेची हेडिंग मशीन्स, स्मार्टकडे मशीन्स संख्येने असंख्य आहेत. पण एक बाळ गुणाचं नाही.''

''अहो त्या भविष्य व वजन यंत्रांच काय झालं?''

''आपल्याकडे लोखसंख्याच एवढी आहे. कोण कोणाच्या गळ्यात घंटा बांधणार?''

कुणीतरी असा विरोधी सूर लावणारा असला की चर्चा रंगतेच. इथेही तसंच झालं मुद्यातून मुद्दे निघाले. ''काही सांगू नका. जनता की संपत्ती.'' म्हणजे कुणीही कशीही वापरायची !

रेल्वेचे डबे, नाटक, सिनेमा थेटर्समधली खुर्च्यांची कव्हर्स फाडणे, स्पंज-पंखे चोरणे, रस्त्यात वाटेल तिथे थुंकणे, फळांच्या साली, अन्नपदार्थ, सिगारेट थोटके रस्त्यावर फेकणे यातली सर्व बेफिकिरी, बेपर्वाई, बेशिस्तपणावरील सर्व यंत्र वापरात व देखभालीत दिसून येते. अस्वच्छता, प्रदूषण आणि साथीचे रोगास आपणच आमंत्रण देतो. नागरिक संस्थांवर ते निवारण्यासाठी खर्चाचा भार पडून वसूलीसाठी कर रूपाने आपणच त्यांची किंमत मोजतो.

एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. आपण आपल्या घरात कुठेही कचरा फेकतो का? थुंकणे, तंबाखू पिचकाऱ्या, शौचविधी करतो का? मग विद्यार्थी शाळा कॉलेजच्या स्वच्छतागृह, मुताऱ्यांमध्ये बीभत्स, अश्लील चित्रे मजकूर कसा लिहितात? त्यांच्या घरातल्या स्नानगृहात आलेल्या पाहुण्याने असं केलं तर त्यांना आवडेल? इथे भरमसाठ लोकसंख्येचा काय संबंध?

एका शाळेच्या सहलीमध्ये काही विद्यार्थ्यांनी खाऊचा रिकामा खोका टाकायला कचराकुंडीचा शोध घेऊन त्यातच तो कचरा टाकला. म्हणजे हा चांगल्या सवयींचा संस्कार आहे. परंतु त्याविरुद्ध - सिंगापूरला एक हिंदी गायक टॅक्सीतून चाललेला. सिगारेटचं रिकामे पाकिट दिले भिरकावून रस्त्यावर. पाचच मिनिटांत पोलिसाने येऊन टॅक्सी थांबवली. गायकास एक डॉलर दंड झाला. आता ही दंडाची पावती कशाला ठेवायची? गायकाने 'आदतसे मजबूर' ती पावती चुरगाळून परत रस्त्यावर फेकून दिली. पुन्हा त्यास दंड झाला !

नियम मोडण्यातही आपणास खंत वाटत नाही. एका स्कूटरवाल्यास मी थांबवले. ''अरे हा वन-वे आहे.'' तो मला विचारतो -''तेरे बापका रस्ता है क्या?'' तो सार्वजनिक रहदारी नियमभंग गुन्हा करून पुढे गेला व एका झाडाखालच्या गुप्त पोलिसाचा शिकार झाला. पण जबरदस्त शिक्षा करून हे प्रश्न सुटणारे नाहीत. स्वच्छता व शांतता पाळण्यासाठी पाट्या असतात. पण मुद्दामच लोक दुर्लक्ष करून अपघात आणि गोंगाट करतात. एक मिनिट वाचविण्यासाठी जागा नसताना वाहने ओव्हरटेकचा प्रयत्न करतात आणि सर्वच जण चांगले अर्धातास ट्रॅफिकजॅममध्ये अडकतात. ह्या विकृत गोष्टी टाळण्यास एकच उत्तर : प्रत्येक नागरिकास मनापासून, उपजतच वाटलं पाहिजेः ''माझ्या घराप्रमाणे मला माझं गाव, जिल्हा, देश स्वच्छ सुंदर दिसला पाहिजे व त्यासाठी मी प्रयत्न करेन.'' प्रथम स्वतःलाच वाटलं पाहिजे - 'सुंदर मी होणार.'

**- मनोहर तळेकर**
माजी ऑफिस सुपरिंटेंडेट
व्ही.पी.एम. पॉलिटेक्निक, ठाणे

ज्यादिवशी आपली थोडीही प्रगती झाली नाही तो दिवस फुकट गेला असं समजा.

# 'महानुभाव' दर्शन

*महानुभाव पंथाविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

भारतातील सर्वात जुना धर्म म्हणजे हिंदुधर्म होय. हिंदुधर्म जगातील सर्वात जुन्या वा प्राचीन धर्मांपैकी एक मानला जातो. हिंदुधर्माचे अभ्यासक हा धर्म सुमारे पाच हजार (५०००) वर्षांहून जुना आहे असे म्हणतात. भारताव्यतिरिक्त नेपाळ या देशातदेखील हिंदुधर्म मानणाऱ्यांची व आचरणात आणणाऱ्यांची लक्षणीय संख्या आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात ७९.८% (९६.६३ कोटी) एवढी हिंदुची संख्या आहे.

हिंदु धर्माने गेल्या पाच हजार वर्षांच्या काळात अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. हिंदु धर्माचे वेद, उपनिषद, पुराणे, अरण्यक इत्यादी पवित्र ग्रंथ होत (धार्मिक साहित्य होय.) एकंदरीतच आपण या पाच हजार वर्षांचा विचार केला असता असे लक्षात येते की, पुरातन वा प्राचीन काळापासून ते आधुनिक (अर्वाचीन) काळापर्यंत हिंदु धर्माला आव्हान म्हणून काही नवीन धर्म उदयास आले. तसेच हिंदु धर्मातच काही विशेष पंथ निर्माण होऊन त्यांनी हिंदू धर्माला लोकप्रिय करण्याचे काम केले. यापैकी नवीन धर्मांचा विचार केला तर इसवीसनपूर्व सहाव्या (६व्या) शतकात जैन व बौद्ध हे दोन धर्म अस्तित्वात आले. जैन धर्माचे चोवीस तीर्थंकर असले तरी त्यांचा चोवीसावा तिर्थंकर महावीर जैन यानेच त्या धर्माला खऱ्या अर्थाने धर्माचे अधिष्ठान प्राप्त करून दिले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. बौद्ध धर्माच्या बाबतीत गौतम बुद्धाने त्या धर्माची स्थापना केली यात दुमत नाही.

हिंदुधर्मातील पंथांचा विचार केला तर असे जाणवते की, फार पूर्वीपासून या धर्मात शैव व वैष्णव हे पंथ आढळतात. शैव पंथीय प्रामुख्याने शिवाची (महादेवाची) उपासना करतात. तर वैष्णव विष्णूची व त्याच्या विविध अवतारांची पूजा-अर्चा करताना दिसतात. दे दोन प्राचीन काळापासूनचे पंथ सोडले तर प्रामुख्याने मध्ययुगीन काळात महाराष्ट्रामध्ये वारकरी पंथ वा संप्रदाय हा पंथ मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झालेला आढळतो.

महाराष्ट्रात मध्ययुगात यादव राजवंशाचे राज्य असतानाच्या काळापासून वारकरी पंथाचा प्रसार वेगाने झाल्याचे दिसते. याचे कारण म्हणजे इसवीसनाच्या तेराव्या (१३व्या) शतकात ज्ञानेश्वरांनी 'भगवद्गीता' 'ज्ञानेश्वरी' या नावाने मराठीत आणली व तो वारकरी पंथाचा प्रमुख ग्रंथ ठरला. ज्ञानेश्वरांनंतर, नामदेव, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांची एक परंपराच निर्माण झाली. वारकरी पंथाचे वैशिष्ट्य म्हणजे ही परंपरा आजतागायत अस्तित्वात आहे. वारकरी पंथाचे दैवत पंढरपूरची विठ्ठल माउली आहे व त्यास ते श्रीकृष्णाचा अर्थात विष्णूचा अवतार मानतात हे सर्वश्रूतच आहे.

महानुभाव पंथदेखील अशाच एका पंथांपैकी एक असून तो हिंदुधर्मान्तर्गतच पंथ होय असे तज्ज्ञांचे मत आहे. महानुभाव पंथाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे काही अभ्यासकांच्या मते हा पंथ अवैदिक आहे. याचाच अर्थ तो हिंदुधर्माच्या वेदांना प्रमाण मानत नाही. महानुभाव पंथियांची मोक्ष प्राप्तीसाठी वा परमेश्वर प्राप्तीसाठी साधन म्हणून वेद प्रमाण नाहीत अशी धारणा आहे. परंतु त्यांनी वेदांचा अनादर वा उपहास केलेला नाही.

महानुभाव पंथ जरी महाराष्ट्रात स्थापन झालेला असला तरी त्याचा प्रसार संपूर्ण भारतात झालेला आढळतो. एकेकाळी ह्या पंथाचे अनुयायी

अफगाणिस्तानातील काबूल हे शहर होते. तसेच कंदहार प्रांतापर्यंत त्याचा प्रस्तर झाला होता. भारतास १९४७ साली ब्रिटिशांच्या राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्ती झाली व सोबतच भारताचे विभाजन (फाळणी) होऊन पाकिस्तान (पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान) निर्माण झाला. त्यापैकी पश्चिम पाकिस्तानात महानुभाव पंथीयांचे मठ होते. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर या पंथीयांचे महंत भारतातील पंजाब प्रांतात येऊन तेथे त्यांनी आपल्या पंथाचे मठ उभारले. महानुभाव पंथीयांचे अनुयायी प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, पंजाब आदी प्रांतात आढळतात. महानुभाव पंथास सर्वसामान्य लोक 'मानभाव' असे देखील संबोधतात. महानुभाव पंथ हा महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी पंथ, भटमार्ग व पटमार्ग या नावाने देखील ओळखला जातो. तरीसुद्धा हा पंथ 'महानुभाव' या नावानेच जास्त प्रसिद्ध आहे. उत्तरेकडे व प्रामुख्याने पंजाबकडे या पंथास 'जयकृष्णी पंथ' असे संबोधतात.

महानुभाव पंथीय प्रामुख्याने पंचकृष्णांची उपासना करतात. हे पंचकृष्ण म्हणजे-श्रीकृष्ण चक्रवर्ती, श्रीदत्तात्रेय प्रभू, श्रीचक्रपाणी वा चांगदेव राऊळ, श्रीगोविंद प्रभू वा श्रीगुंडम राऊळ व श्रीचक्रधर स्वामी होत. यापैकी श्रीकृष्ण चक्रवर्ती म्हणजे वसुदेव व देवकीचा पुत्र श्रीकृष्ण असून त्याच्या अनेक लीळा ह्या श्रीचक्रधर स्वामींनी त्यांची शिष्या महदायिसा हिला सांगितल्या होत्या. असे महानुभावीय मानतात. ह्या पंथकृष्णांशी संबंधित पवित्र स्थाने देखील आपणास आढळतात व ही स्थाने पुढीलप्रमाणे आहेत. श्रीकृष्ण चक्रवर्ती : मथुरा, वृंदावन, गोकुळ, गोवर्धन, द्वारावती. श्रीदत्तात्रेय प्रभू : माहूर, पंचाळेश्वर. श्री चक्रपाणी (श्री चांगदेव राऊळ): फलटण, माहूर, द्वारावती. श्रीगोविंद प्रभू : रिधपूर व श्रीचक्रधर स्वामी : रिधपूर, पैठण, डोमेग्राम, रामटेक, खडकुली, डाकराम, जाळीचा देव, बेलापूर, काटोल व इतर काही ठिकाणं. विविध पंचकृष्णांशी संबंधीत ही स्थाने महानुभावीय पंथीयांसाठी अत्यंत पवित्र असून या विविध ठिकाणांना या पंथाचे उपासक भेट देत असतात, किंबहुना तीर्थयात्रेस जातात. श्रीकृष्ण चक्रवर्ती या पंचकृष्णाची सर्व स्थाने उत्तर भारतात व प्रामुख्याने उत्तर प्रदेशात असलेली आढळतात. इतर पंचकृष्णांची बहुतेक स्थाने ही महाराष्ट्रात असलेली आपण पाहतो.

महानुभावियांच्या पंचकृष्णात पहिला क्रम हा श्रीदत्तात्रेय प्रभूंचा आहे. तसे पाहता त्यांचा संबंध माहूर व महानुभवांच्या मते तेथील सह्याद्रीच्या रांगांशी जोडला गेला असला तरी यांचे वास्तव्य अदृश्य रूपाने सर्वत्र असते. या पंथीयांची अशी श्रद्धा आहे की, श्रीदत्तात्रेय प्रभूंनी श्रीचक्रपाणी वा श्रीचांगदेव राऊळ या पंचकृष्णाला माहूर येथे व्याघ्ररूपात दर्शन देऊन त्यांना शक्ती दिली वा शक्तिचा स्विकार करवला. महानुभाव पंथीयांचे श्रीदत्तप्रभू हे श्रीपाद वल्लभ परंपरतेतील त्रिमुखी दत्तात्रेयापेक्षा वेगळे असून ते एकमुखी आहेत. माहूर येथील महानुभावपंथीयांच्या स्थानास देवदेवेश्वर असे म्हटले जाते व येथील मंदिरात एकमुखी दत्ताची मूर्ती आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे श्रीकृष्ण चक्रवर्ती हा पंचकृष्णाचा अवतार महाभारतातील वसुदेव व देवकी यांचा पुत्र व पुढे रणांगणावर आपला शिष्य अर्जुन यास उपदेश करणारा (भगवद्गीता) श्रीकृष्णच होय. श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली 'गीता' या पंथीयांना अत्यंत पूजनीय आहे. श्रीकृष्णास ते परमेश्वराचा पूर्ण अवतार मानतात. परंतु त्याने मनुष्यावतार घेतल्याने त्याच्या ठायी परमेश्वराच्या व मनुष्याच्या ठायी असणारे दोन्ही गुण होते व त्याच्यातील मातृभक्ती, मित्रप्रेम, समता, व्यवहार चातुर्य, विनोदबुद्धी, मार्मिकता हे गुण महत्त्वाचे ठरतात.

पंचकृष्णांतील तिसरे कृष्ण वा परमेश्वर श्रीचक्रपाणी वा श्रीचांगदेव राऊळ हे आहेत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील फलटण या ठिकाणी झाला होता. त्यांच्या आईचे नाव जनकाइसा तर वडिलांचे नाव जनकनायक हे होते. त्यांना अनेक दिवस अपत्य झाले नव्हते. त्यामुळे जनकाइसा मातेने आपले माहेर चाकण येथे चक्रपाणी या देवाची, तर जनकनायकांनी फलटण येथील चांगदेवाची

मूल व्हावे म्हणून आराधना केली होती. त्यामुळे हे पंचकृष्ण, श्रीचक्रपाणी वा श्रीचांगदेव राऊळ या दोन नावांनी प्रसिद्ध आहेत. पुढे चालून श्रीचक्रपाणींचा वा चांगदेवांचा विवाह कमळादू हिच्याशी झाला. परंतु त्यांचे मन संसारात रमले नाही व एकेदिवशी यात्रेच्या निमित्ताने त्यांनी घर सोडले. त्यानंतर ते सध्याच्या नांदेड जिल्ह्यातील माहूर या ठिकाणी आले व तेथेच त्यांना श्रीदत्तात्रेय प्रभूंनी शक्ती स्विकार करविला. श्रीचांगदेव राऊळ यांचा सहवास प्रामुख्याने द्वारावती येथे होता व त्यांनी तेथे अनेकांना विद्यादान केले. तसेच ते गावातील रस्ते खराटा व सूप घेऊन झाडीत असत. या ठिकाणीच त्यांनी देहत्याग करून गुजरातमधील भडोच येथील स्मशानात आणलेल्या हरपाळदेव या व्यक्तीच्या मृतदेहात प्रवेश केला अशी महानुभावीयांची श्रद्धा आहे. श्रीचांगदेव राऊळ यांचा हरपाळदेव-देहरूपी अवतार म्हणजेच श्रीचक्रधर स्वामी होत. श्रीचक्रधर स्वामी हेच महानुभाव पंथाचे संस्थापक मानले जातात.

पंचकृष्णांपैकी चौथे कृष्ण वा परमेश्वर म्हणजे श्रीगोविंदप्रभू हे होत. त्यांना श्रीगुंडम राऊळ असे देखील म्हटले जाते. त्यांचा जन्म सध्याच्या अमरावती (महाराष्ट्र) जिल्ह्यातील रिधपुरमधील काटोपेरे या गावी झाला. हे रिधपूर सध्याच्या अमरावती जिल्ह्यातील मोरशी ह्या तालुक्यात असून ही श्रीगोविंदप्रभूंची पावनभूमी असल्यामुळे (त्यांच्या सहवासाने पुनीत झालेली असल्यामुळे) महानुभाव पंथीयांच्या मनात या ठिकाणाविषयी नितांत आदर व भक्ती आहे. महानुभाव पंथीय रिधपूरचा उल्लेख 'काशी' असादेखील करतात. श्रीगोविंदप्रभूंचे पालन पोषण त्यांच्या मामाने व मावशीने केले होते. कारण त्यांची आई नेमाइसे व वडील अनंतनायक यांचा मृत्यू श्रीगोविंदप्रभू लहान असतानाच झाला होता. श्रीगुंडम राऊळ हे जन्माने काण्व ब्राह्मण होते. त्यांनी द्वारावतीस श्रीचांगदेव राऊळांकडून शक्तीचा स्विकार केला असा उल्लेख महानुभावीयांच्या साहित्यात येतो. श्रीगोविंदप्रभूंचा वास रिधपूरास असल्यामुळे त्यांच्या जयंतीच्या वेळेस या पंथाचे अनेक अनुयायी या ठिकाणास भेट देतात. तसेच आषाढी व चैत्र पौर्णिमेस देखील हजारो भक्त या क्षेत्रास भेट देतात. गोविंदप्रभूंच्या ठायी समता, क्षमाशीलता, परोपकारी बुद्धी इत्यादी सत्त्वगुण होते. त्यांना दलिताविषयी कनवाळा होता. तसेच अशा भगिनी ज्यांना सासरी जाच आहे वा ज्यांना आईवडील, बहीणभाऊ नाहीत अशा स्त्रियांना गोविंदप्रभूंचा निवास म्हणजे जणू माहेरच होते. अशाच एका स्त्रीने त्यांचा देहांत झाल्यानंतर ''माझे माहेर गेले'' म्हणून टाहो फोडला. यात काही आश्चर्य नव्हते. कारण त्या स्त्रीस गोविंदप्रभूंनी आपली मुलगी मानले होते. श्रीचक्रधर स्वामी हे पंचकृष्णांपैकी पाचवे व शेवटचे परमेश्वर होत. त्यांना श्रीगोविंदप्रभूंनी शक्ती दिल्याचा उल्लेख आढळतो. याचाच अर्थ श्रीगोविंदप्रभू हे श्रीचक्रधर स्वामींचे गुरू होत. श्रीचक्रधर स्वामी हे श्रीचांगदेव राऊळांचाच अवतार होत हे आपण अगोदर पाहिलेलेच आहे. श्रीचांगदेव राऊळ वा श्रीचक्रपाणींनी गुजरातमधील भडोच येथील मृत पावलेल्या हरीपाळदेव या व्यक्तीच्या शरीरात प्रवेश केला व तोच पुढे श्रीचक्रधर या नावाने प्रसिद्ध झाला. महानुभाव पंथाची खऱ्या अर्थाने स्थापना व प्रसार करण्याचे श्रेय श्रीचक्रधर स्वामींनाच जाते. श्रीचक्रधर स्वामी मुळये गुजरातचे. मात्र त्यांना अस्खलीत मराठी येत असे व त्यांनी महानुभाव पंथाचा प्रसार करण्यासाठी व पंथासंबंधीची ग्रंथसंपदा निर्माण करण्यासाठी प्रामुख्याने मराठी भाषेचाच वापर केलेला आढळतो. हरिपाळास 'चक्रधर' हे नाव त्यांचे गुरू श्रीगोविंदप्रभू यांनी दिले होते.

श्री चक्रधर स्वामींच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाविषयीच मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध आहे व याचे कारण म्हणजे 'लीळाचरित्र' हे त्यांचे चरित्र होय. हे चरित्र एक विद्वान महानुभाव, म्हाइंभट यांनी लिहिलेले आहे. म्हाइंभटांचा जन्म एका खूप श्रीमंत अशा ब्राह्मण कुटुंबात झाला होता. ते तेलंगणात जाऊन सर्व विद्या संपन्न करून महाराष्ट्रात परत आले होते. त्यांनी श्रीगोविंदप्रभूंकडून महानुभाव पंथाची रिधपूर येथे दीक्षा घेतली होती. म्हाइंभटांना 'मराठी भाषेतील पहिला चरित्रकार' म्हणून संबोधले जाते. त्यांनी श्रीचक्रधर स्वामींचे 'लीळाचरित्र' तसेच गोविंदप्रभूंचे 'श्रीगोविंदप्रभू चरित्र' ही चरित्रे लिहून

जणू पंचकृष्णीयांपैकी दोन परमेश्वरांना खऱ्या अर्थाने आदरांजली वाहिली आहे. त्यांनी दहा आरत्यादेखील रचल्या होत्या व त्या आरत्यांच्या संग्रहाचे शीर्षक 'जतीचा दशकू' असे आहे. म्हाइंभटांनी 'लीळाचरित्र' लिहिताना खूप मोठे परिश्रम घेतले व वेळ पडल्यास अनेक ठिकाणांना भेटी देऊन तेथील लोकांशी संपर्क साधून व त्यांच्याशी चर्चा करून तसेच त्यांच्याकडून चक्रधर स्वामींच्या 'लीळा' ऐकून घेऊन त्या लिहून घेण्याचे कष्ट घेतले. म्हाइंभटांनी आपल्या साहित्याच्या रूपाने मराठी भाषेची मोठी सेवा केली आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. श्रीचक्रधर स्वामी दिसायला खूप सुंदर होते असे उल्लेख आढळतात. त्यांची वाणी मधूर होती व त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्यांना त्यांचा वेध लागत असे. महानुभावीय पंथीयांच्या दृष्टीने श्रीचक्रधर स्वामींचा अवतार हा श्रेष्ठ अवतार ठरतो व त्याच्यामते आजही त्यांचा अवतार अस्तित्वात असून त्यांचा निवास हिमालयात असतो. श्री चक्रधर स्वामी हे पंचकृष्णांपैकी शेवटचे परमेश्वर होत.

महानुभाव पंथीयांनी चरित्रे, पोथ्या व पद्य या स्वरूपात विपुल साहित्य निर्माण केले. नंतरच्या काळात महानुभाव पंथीयांनी आपले लिखाण सांकेतिक लिपीत केलेले आढळते. याची सुरुवात सह्याद्रीवर्णनांचे लेखक खळोबास यांनी केली असे अभ्यासकांचे मत आहे. या लिपीस सुरुवातीच्या काळात 'नागरी' वा 'सकळी' असे म्हटले जात असे. नंतरच्या काळात तर 'सकळी' व्यतिरिक्त अनेक सांकेतिक लिप्या तयार झाल्याचे आढळते. या लिप्या पुढील प्रमाणे होत - 'सुंदर लिपी', 'पारमांडल्य लिपी', 'अंक लिपी', 'शून्य लिपी', 'सुभद्रा लिपी', 'श्री लिपी', 'वज्र लिपी', 'मनोहरा लिपी', 'कवीश्वरी लिपी' इत्यादी. या सांकेतिक लिपींमुळे महानुभव पंथाचे लिखाण व त्याचे वाचन बराच काळ नव्हे अनेक शतके फक्त पंथीयांपुरतेच मर्यादित राहिले. विसाव्या (२०व्या) शतकातील महानुभव पंथाचे ज्येष्ठ अभ्यासक व संशोधक डॉ. वि. भि. कोलते यांनी आपल्या 'महानुभाव तत्त्वज्ञान' या पुस्तकात त्यांना ह्या सांकेतिक लिप्यांमधील वाङ्मयाचे वाचन करून आकलन करून घेण्यासाठी किती अथक प्रयत्न करावे लागले ते नमूद केले आहे. अर्थात, त्यांना याकामी महानुभव पंथाच्या अनेक महंतांनी व विद्वानांनी खूप मदत केली असेही त्यांनी नमूद केले आहे. त्यापैकी महंत श्रीदत्तलक्षराज व श्रीयक्षदेव, श्रीगोपीराज, श्रीकृष्णराज दादा लासूरकर पारिमांडल्य यांचा पोथ्या उपलब्ध करून देण्याचा व बाळकृष्ण शास्त्री यांनी त्या अभ्यासताना मोठी मदत केल्याचा उल्लेख देखील डॉ. कोलत्यांनी केला आहे. वि. भि. कोलत्यांनी अशाप्रकारे मेहनत घेऊन 'महानुभाव तत्त्वज्ञान' हा ग्रंथ व या पंथावर प्रकाश टाकणारे इतर लिखाण करून मोठे कार्य केले आहे यात वाद नाही.

महानुभाव पंथीयांनी एवढी विपुल साहित्य निर्तिती केली आहे की, तिचा संपूर्ण वेध घेण्यासाठी एक वेगळा लेख लिहावा लागेल. तरीसुद्धा त्यांच्या 'साती ग्रंथा' चा उल्लेख करावसा वाटतो. या पंथाच्या सुरुवातीच्या काळात रचल्या गेलेल्या काव्यस्वरूपातील सात ग्रंथांना 'साती ग्रंथ'म्हटले जाते. हे सात ग्रंथ व त्यांचे कर्ते पुढीलप्रमाणे आहेत. 'रुक्मिणी स्वयंवर' - कवी नरेंद्र, 'शिशुपालवध' - कवी भास्कर, 'उद्धवगीता' - कवी भास्कर, 'वच्छहरण' - कवी दामोदर पंडित, सह्याद्री वर्णन - कवी खळोबास, 'ज्ञानप्रबोध' - कवी विश्वनाथबास व 'ऋद्धिपुरवर्णन' - कवी नारायण बास अशा तऱ्हेने या पंथास विद्वान कवी-लेखकांची व तत्त्ववेत्त्यांची मोठी परंपरा लाभली होती असे सिद्ध होते.

महानुभाव पंथीयांना रिधपूर, मथुरा, गोकुळ, पंचाळेश्वर इत्यादी व नांदेड जिल्ह्यातील माहूर, नांदेड, गोपालचौंडी व राहेर ही स्थाने खूप पूजनीय आहेत. ह्या ठिकाणी महानुभाव पंथीय तीर्थयात्रेसाठी जातात व अगोदर नमूद केल्याप्रमाणे रिधपूर या स्थानास महानुभावीयांच्या ठायी 'काशी'चा दर्जा आहे. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यामध्ये लिंबगाव, इजळी, मुगूट, कांबळजा, सांगवी, विजेगाव, तामसा ही स्थानेदेखील महानुभावांना पूजनीय आहेत.

---

एकांतात मिळणाऱ्या क्षणांचं आपण काय करतो यावर आयुष्याकडे पाहाण्याचा आपला दृष्टीकोन व्यक्त होतो.

महानुभव पंथ हा खचीतच हिंदुधर्मान्तर्गत अतीशय महत्त्वाचा पंथ आहे यात काहीच वाद नाही. या पंथाची आपली एक वेगळी विचारशैली असून त्यास त्यांच्या विशिष्ट तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. त्यांच्या विचार धारेचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे पंथांच्या प्रवर्तकांनी, आचार्यांनी अतिशय विद्वत्तापूर्वक तीची मांडणी केली आहे. या पंथाचे बरेच लिखाण नंतरच्या काळात सांकेतिक लिप्यांमध्ये झाल्यामुळे ते जनसामान्यांपर्यंत फार काळापर्यंत पोहोचू शकले नाही. मात्र विसाव्या (२० व्या) व एकविसाव्या (२१ व्या) शतकामध्ये डॉ. वि. भि. कोलते, डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. अविनाश आवलगावकर इत्यादी विद्वानांनी या पंथावर मराठीत लिखाण करून मोठे कार्य केले आहे व महानुभाव पंथाविषयीची माहिति जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सरते शेवटी महानुभाव पंथाचे वर्णन, हा पंथ म्हणजे वैचारिक, सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक दृष्ट्या समृद्ध महाराष्ट्राच्या मुकुटातील एक तेजस्वी मणी होय असे करावेसे वाटते.

**संदर्भ :**

**महानुभाव साहित्य** : डॉ. अविनाश आवलगावकर

**महानुभाव साहित्य आणि त्याचे वाङ्मय** : शं. गो. तुळपुळे

**महानुभव तत्त्वज्ञान** : वि. भि. कोलते.

नांदेड जिल्हा गॅझेटिअर (भाग - २)

www.maharashtratourism.gov.in:visited on 23-09-2015

**सहा.प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : 9820328226
Email : subhashinscotland@gmail.com

•••

(पृष्ठ क्र.७ वरून **सिम रेप येथील पुरातत्त्व उपवन** )



**मंदिराच्या दगडावर कोरलेले सुंदर चित्र**

पायऱ्या उतरून आम्ही खाली आलो. तोपर्यंत संध्याकाळ झाली होती. आमचा टुकटुकवाला आमची वाटच पाहात होता. त्याने आम्हाला सूर्यास्त दाखवायला नेले. एका विशिष्ट ठिकाणाहून सूर्यास्त चांगला दिसतो म्हणून लोकांनी तिथे गर्दी केली होती. आम्हीही त्या गर्दीत सामील झालो. मावळत्या सूर्याचे दर्शन घेऊन आम्ही परतीची वाट धरली. हॉटेलमध्ये पोहोचेपर्यंत अंधार पडला होता.



**मावळणारा सूर्य**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

जगामध्ये कोणतीही वस्तू चांगली किंवा वाईट असत नाही. आपले विचारच ती वस्तू चांगली किंवा वाईट बनवतात.- शेक्सपिअर

# देवीचे ''नवरात्र''

*आदिशक्तींना मातृकाशक्ती मानून त्यांचे पूजन सुरू झाले. या देवीशक्तींचे महात्म्य विशद करणारा लेख - संपादक*

भारत वर्षाच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये पुराणकाळ हा दैवतदृष्ट्या व उपासनादृष्ट्या अत्यंत समृद्धकाळ मानला जातो. तेव्हाच आदिशक्तींना मातृकाशक्ती मानून त्यांचे पूजन सुरू झाले. देवीशक्ती ही दुर्गा, भवानी, रेणुका, काली, अंबा, महालक्ष्मी, सरस्वती, संतोषी, महिषासुरमर्दिनी, चामुडा, चंडिका, कालिका, एकवीरा, वज्रेश्वरी, हरबासिनी, जीवदानी इ. विविध नावांनी उपासली जाते.

सामान्यतः 'देवी' या शब्दाचा अर्थ स्त्री अथवा देवपत्नी असा होता. पण विशेषतः शिवपत्नी पार्वती हिलाच देवी हे नामाभिधान लावतात. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तीरूप मूर्तीला 'देवी' असे नाव मिळाले आणि शाक्तसंप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले. देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पाहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही तिची सौम्य रूपे तर दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे होत. त्यातही भद्रकाली, चामुंडा, महामारी, रक्तदंतिका इ. तिची काही रूपे तर अती उग्र व महारौद्र आहेत.

दक्षकन्या या नात्याने देवीने अनेक देवतांना जन्म दिला आहे. ब्रह्मा, विष्णू व शिव यांच्या मागची प्रेरक शिवशक्ती म्हणजे देवीच होय. ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुंडा व महालक्ष्मी या देवीच्या अष्टशक्ती होत. देवीचा प्रमुख ध्यानमंत्र असा आहे -

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियतः प्रणतः स्म ताम्।।

अर्थात - देवी, महादेवी व शिवा हिला सतत नमस्कार असो. प्रकृती व भद्रा हिला नमस्कार असो. देवीला आम्ही नित्य प्रणत आहोत.

देवी उपनिषदामध्ये देवी गायत्री मंत्र दिला आहे. तो असा - महालक्ष्मीश्च विद्महे, सर्व सिद्धिश्च धीमही।
तन्नो देवी प्रचोदयात्।

याच देवी उपनिषदाला देवी अथर्वशीर्ष असेही म्हणतात. गाणपत्य संपद्रायात गणपती अथर्वशीर्षाला जे महत्त्व आहे तेच महत्त्व शाक्त संप्रदायात देवी अथर्वशीर्षाला आहे.

धर्मग्रंथानुसार वर्षभरात चार नवरात्री असतात. यापैकी दोन गुप्त तर दोन प्रकट नवरात्री होत. गुप्त नवरात्री आषाढ व माघ या दोन महिन्यांत येतात तर प्रकट नवरात्री चैत्र आणि अश्विन महिन्यात साजऱ्या केल्या जातात. हिंदू धर्मात भगवती देवीची विशेष आराधना वर्षातून दोन वेळा केली जाते. वासंतिक नवरात्रात चैत्र शुद्ध प्रतिपदा ते चैत्र शुद्ध नवमीपर्यंत आणि शारदीय नवरात्रात अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंत देवीची उपासना केली जाते.

चांद्र वर्षाचा पहिला मास म्हणजे चैत्र महिना. या महिन्याच्या पौर्णिमेला किंवा मागे-पुढे चित्रा नक्षत्र असते म्हणून त्या नक्षत्रावरून याला 'चैत्र' असे नाव मिळाले आहे. या महिन्याला 'मधुमास' असेही म्हणतात. या महिन्यापासून वसंत ऋतू सुरू होतो. चैत्र शुक्ल प्रतिपदेला संवत्सराचा प्रारंभ होतो. या दिवशी सूर्योदयाच्या वेळी ब्रह्मदेवाने सर्व सृष्टीची निर्मिती केली असे हेमाद्रीचे ('चतुवर्ग चिंतामणी' वेदांग ज्योतिषावर भविष्य

वर्तविणारा ग्रंथ - ग्रंथकार हेमाद्री) ब्रह्मवचन आहे. या दिवशी सूर्योदयी जो वार असेल तो वर्षेश समजतात आणि याच दिवशी चंडिकेच्या नवरात्राला प्रारंभ होतो.

या देवी सर्वभुतेषु, शक्ती रूपेण संस्थिता
नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमोनमः॥

देवीचे स्मरण करताना हा ध्यानमंत्र म्हटला जातो.

**चैत्र नवरात्र का साजरे केले जाते व त्याचे महत्त्व -**

१) ऋतू-विज्ञानानुसार चैत्र महिन्यात हवामान बदलते. याच महिन्यात वसंत ऋतूचे आगमन होते. यावेळी काम करण्यासाठी शरिराला अतिरिक्त ऊर्जेची गरज असते; जी नवरात्रातील नऊ दिवस देवीच्या पूजनातून भक्तांना प्राप्त होते असे मानले जाते.

२) चैत्र प्रतिपदेपासून नवरात्रास प्रारंभ होतो आणि याच दिवशी हिंदू पंचांगानुसार नववर्षारंभ होतो. 'नव' या शब्दाचे दोन अर्थ आहेत एक म्हणजे नऊ आणि दुसरा नवीन. म्हणूनच नवीन संवत्सराच्या प्रथम दिनी त्यास 'नव' म्हणणे उचितच ठरते आणि दुर्गा देवीच्या अवतारांची संख्यासुद्धा नऊ असल्याने नऊ दिवस तिची उपासना केली जाते.

३) आपल्या कृषिप्रधान भारत देशात शेतपिकांच्या दृष्टीने चैत्र महिन्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आषाढात धान्य अर्थात गहू, ज्वारी वगैरे तयार होऊन ते याच कालावधीत घरी आणले जाते. म्हणूनच त्या आनंदाप्रीत्यर्थ दारावर धान्याच्या कणसांची तोरणं बांधून पुढील नऊ दिवसांपर्यंत मातेची आराधना केली जाते.

**चैत्र नवरात्राबद्दल आणखी काही विशेष**

१) धर्मग्रंथानुसार चैत्र शुक्ल प्रतिपदेस रेवती नक्षत्रात विष्कुम्भ योगामध्ये दिवसा भगवान विष्णूंनी मत्स्य अवतार धारण केला होता.

२) सर्व युगांमधील प्रथम सत्ययुगाचा आरंभसुद्धा याच दिवशी झाला असे मानले जाते.

३) याच दिवशी मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री रामचंद्राचा राज्याभिषेक झाला होता.

४) युधिष्ठिर संवत अर्थात युगाब्धचा आरंभसुद्धा याच तिथिला मानला जातो.

५) उज्जयिनी अर्थात उज्जैनचा सम्राट विक्रमादित्य याने सुरू केलेल्या विक्रम-संवतचा आरंभ याच दिवशी झाला होता.

नवरात्रातील नऊ दिवसात देवीच्या विविध रूपांचे पूजन केले जाते.

१) चैत्र शुक्ल प्रतिपदा - माता शैलपुत्रीचे पूजन प्रथम - दिनी केले जाते. प्रतिकूल परिस्थितीमध्येही हिमालयासारखं दृढ, निश्चयी व ठाम रहावं असा संदेश मातेचे हे रूप आपल्याला देते.

२) चैत्र शुक्ल द्वितीया - दुसऱ्या दिवशी माता ब्रह्मचारिणीचे पूजन केले जाते. ब्रह्मचारिणी माता आपल्याला संदेश देते की तप, साधना करून कोणत्याही परिस्थितीवर आपल्याला विजय प्राप्त करता येऊ शकतो.

३) चैत्र शुक्ल तृतीया - माता चंद्रघटा स्वरूप हिची आराधना या दिवशी केली जाते. या मातेच्या कृपेने तिचे भक्त आपल्या सर्व शत्रूंवर आणि अवगुणांवर विजय प्राप्त करू शकतात असे मानले जाते.

४) चैत्र शुक्ल चतुर्थी - माता कुष्मांडाचे पूजन केले जाते. हिच्या पूजनाने सर्व रोग-शोक यांचा विनाश होऊन आयुष्य, यश व बल यांची वृद्धी होते. तसेच मनातील नैराश्याचा अंधकार दूर होतो.

५) चैत्र शुक्ल पंचमी - स्कंदमातेचे पूजन पाचव्या दिवशी केले जाते. आपल्या आत्म्याची शुद्धी होऊन आंतरिक नकारात्मक भावना नष्ट होतात.

६) चैत्र शुक्ल षष्ठी - माता कात्यायनीचे पूजन या दिवशी केले जाते. कठोर साधनेने कोणत्याही प्रकारचे सुख प्राप्त करता येते असा संदेश ही माता आपल्याला देते.

७) चैत्र शुक्ल सप्तमी - माता दुर्गाच्या सातव्या शक्तीचे नाव आहे- कालरात्री. माता कालरात्री संदेश देते की, जीवनाचे वास्तव कितीही भयाण अथवा अंधकारमय असो, आपण सतत भयमुक्तच आचरण केले पाहिजे.

८) चैत्र शुक्ल अष्टमी - माता महागौरीचे पूजन या दिवशी केले जाते. आत्मबल व आत्मविश्वास याशिवाय जगात काहीच शक्य नाही. म्हणून या देवीच्या पूजनाने अशक्यप्राय गोष्टीही शक्य होतात.

९) चैत्र शुक्ल नवमी - सिद्धीरात्री मातेची उपासना या दिवशी केली जाते. शिव हे ब्रह्मांडाचे पालनकर्ते आहेत, तर माता सिद्धीरात्री त्यांच्या सोबत या ब्रह्मांडाचे संचलन करते. म्हणूनच दुर्गेचे हे रूप कार्यकुशलतेचा संदेश आपल्याला देते.

याच दिवशी 'रामनवमी' सुद्धा साजरी केली जाते. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजल्या गेलेल्या प्रभू श्री रामचंद्रांचा जन्म झाला. म्हणून तिला 'रामनवमी' असे म्हणतात.

अवांतर - भारताच्या उत्तरेकडील प्रदेशांमध्ये 'ज्येष्ठेचा दशहरा' हा नवरात्रीच्याच धर्तीवर आधारित ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा ते ज्येष्ठ शुद्ध दशमी या कालावधीत उत्सव साजरा केला जातो. दशमीच्या दिवशी गंगेचा जन्म झाला म्हणजेच गंगा भूतलावर अवतरली असे मानले जाते म्हणूनच या सणाला 'गंगा दशहरा' असेही म्हणतात.

रामनवमीच्या पार्श्वभूमीवर - रामोपासक म्हणजेच रामाची उपासना ज्या घरांमध्ये केली जाते त्या घरांमध्ये गुढीपाडवा ते राम-नवमी या काळात रामरक्षेचे वाढीव पाठ पठण करण्याची पद्धत आहे. म्हणजे प्रतिपदेला एक पाठ, द्वितीयेला दोन पाठ असे करत रामनवमीला नऊ पाठ म्हटले जातात. रामाच्या उपासनेची एक पद्धत म्हणूनही याला मान्यता मिळाली आहे.

देवीच्या नवरात्रांप्रमाणे पुरुष देवतांचेही नवरात्र साजरे केले जातात -

चातुर्मास संपतो अर्थातच देवदिवाळी म्हणजेच मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी यालाच चंपाषष्ठी असेही म्हणतात. या कालावधीत खंडोबाचे नवरात्र आजही घराघरात उत्साहात साजरे केले जातात.

**कृष्ण-पक्षात साजरे होणारे देवांचे नवरात्र -**

कार्तिक कृष्ण प्रतिपदा ते कार्तिक कृष्ण अष्टमी या कालावधीत भैरवाचे नवरात्र साजरे होते. कार्तिक कृष्ण अष्टमी हा भगवान भैरवाचा जन्मदिवस मानला जातो.

तसेच श्रावण कृष्ण प्रतिपदा ते श्रावण कृष्ण अष्टमी म्हणजेच कालाष्टमी या कालावधीत श्रीकृष्णाचे नवरात्र साजरे केले जातात. येथेही भगवान श्री कृष्णाचा जन्म साजरा होतो.

**सौ. साधना कारंडे-जोशी**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर मा. वि., ठाणे.

•••

दिशा
नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

---

आपला जन्म होतो तेव्हा आपण रडत असतो आणि लोक हसत असतात. मरताना आपण असं मरावं की आपण हसत असू आणि लोक रडत असतील !

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### एक दिवस शिक्षकांचा ...

डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) मध्ये ५ सप्टेंबर शिक्षकदिन म्हणून एका वेगळ्या पद्धतीने साजरा केला गेला. यानिमित्त एका दिवसापुरते विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कमी करण्यासाठी त्यांना दप्तरात फक्त एक वही, लेखनसाहित्य, डबा, पाणी इ. आणण्यास सांगण्यात आले होते. तर इ. ७वीतील विद्यार्थ्यांची शिक्षक म्हणून निवड करण्यात आली होती. फक्त शिक्षकच नाही तर मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिपाई यांची भूमिकादेखील विद्यार्थीच पार पाडत होते. दुपार विभागात या भूमिका इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी पार पाडल्या.

एकंदर शिक्षकांची भूमिका जवळून समजून घेण्याचा नवीन अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. वर्गातील विद्यार्थीसुद्धा या अनुभवाचा हिस्सा बनू शकले. लहानपणीचा टिचर्स-टिचर्स या खेळाचा अनुभव विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षपणे घेतला.

### अभिनंदन!

शनिवार दि. ५ सप्टेंबर २०१५ रोजी काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात 'भारत विकास परिषदेतर्फे' शिक्षकदिन समारंभ संपन्न झाला. त्यानिमित्ताने आपल्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. पांचाळ सर यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

तसेच इ. ९ अ मधील अदिती गिजे व ओम सूर्यवंशी यांना 'गुणवंत विद्यार्थी' म्हणून गौरवण्यात आले.

तसेच ब्राह्मण सेवा संघ, ठाणे तर्फे 'आदर्श शिक्षक' म्हणून श्री. विलास कोळी यांना गौरवण्यात आले.

### पाहुणे म्हणून जातात तेव्हा...

समर्थ शिक्षा मंडळ आणि चॅरीटी ट्रस्ट द्वारा संचलित, समर्थ मुलांचे / मुलींचे विद्यालय, कलिना, सांताक्रूज आयोजित शिक्षकदिन समारोहाच्या निमित्ताने दि. ७ सप्टेंबर २०१५ रोजी आपल्या शाळेतील सौ. साधना कारंडे-जोशी यांना त्यांचा 'कवितेच्या वाटेवर' हा मराठी कविता रसग्रहणाचा कार्यक्रम सादर करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रिक केले होते.

या प्रसंगी मंडळाचे विश्वस्त श्री. मणेरीकर सर व मा. मुख्याध्यापिका सौ. लोकरे मॅडम आणि इ. ९ वी, १० वीचे विद्यार्थी, शिक्षक या सर्वांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

मायबोली मराठी आणि मराठी साहित्याच्या प्रेमाखातर सौ. साधना कारंडे-जोशी यांनी सुरू केलेल्या त्यांच्या 'कवितेच्या वाटेवर' या उपक्रमाला शुभेच्छा!

### स्मृतिदिन

मंगळवार दि. ८ सप्टें. २०१५ रोजी वीर सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त इ. १० वी अ, ब, क, ड साठी एक कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सतीश भिडे यांना आमंत्रित केले होते. त्यांनी पेटी व तबला या वाद्यांच्या साथीने वीर सावरकरांचे स्वातंत्र्यासाठी केलेले उल्लेखनीय कार्य सांगितले.

'अखंड भारत' ही संकल्पना सर्वांच्या मनात रुजवण्यासाठी केलेला हा एक प्रयत्न होता.

### 'वाचाल' तर वाचाल

जिज्ञासा ट्रस्ट ठाणे या संस्थेच्यावतीने सुरू केलेल्या 'वाचूया आनंदे। लिहूया स्वच्छंदे। बोलूया नेटके।, ह्या नवीन

उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वाचलेल्या साहित्यावर बोलावे, नाट्यरूपात अथवा वाचनाच्या स्वरूपात बोलून दाखवावे आणि मुख्य म्हणजे काहीतरी लिहित जावे हे उद्दिष्ट ठरवले आहे.

या उपक्रमांतर्गत पहिला कार्यक्रम अभिनय कट्ट्याच्या सहकार्याने रविवार दि. १३ सप्टें. २०१५ रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमात आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या वाचनातील महाभारतातील 'भीष्म' या व्यक्तिरेखेवर वाचन केले. यातील सहभागी विद्यार्थी खालीलप्रमाणे -

शुभम् अवघडे - १० अ	सृष्टी सिनलकर - ९ ब
हितिका पाटी - ८ ब	कौस्तुभ जाधव - ७ ब
कनिष्क जाधव - ७ ब	ऋषिकेश माने - ७ ब
साहील उदुगडे - ७ ब	प्रथमेश गावडे - ७ ब
कौस्तुभ भुरे - १० अ

या सर्व विद्यार्थ्यांना सौ. संगिता तातळे आणि सौ. उज्ज्वला धोत्रे यांनी मार्गदर्शन केले.

### वाचन प्रेरणा दिवस

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या स्मरणार्थ दि. १५ ऑक्टोबर या त्यांच्या जन्मदिनी सर्व शाळांमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला.

त्यानिमित्ताने सकाळ विभागात इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना प्रसिद्ध समुपदेशक श्री. आनंद भागवत यांनी वाचनाच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

तसेच या दिवशी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने ग्रंथालयात पुस्तक कट्टा तयार करण्यात आला व काही विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाला पुस्तके भेट म्हणूनही दिली.

तसेच इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी या दिवशीचे १ ते ९ तासिका संपूर्ण दिवस विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाचन केले.

### अभिनंदन!

शनिवार दि. १७/१०/२०१५ रोजी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद आयोजित जिल्हास्तरिय प्रकल्प सादरीकरण पार पडले.

आपल्या शाळेतील विद्यार्थ्यानी सादर केलेल्या ६ प्रकल्पापैकी ३ प्रकल्पांची निवड राज्य पातळीच्या प्राथमिक फेरीसाठी झाली आहे.

गट क्र.१ - १) आदिती गिजे ९ अ
२) सिद्धांत गायकवाड ९ अ
३) सौरभ कदम ११ वी

गट क्र.२ - १) ऋचा जोशी ७ अ
२) श्रुती खांडेकर ७ अ
३) प्रज्ञा मोरे ७ अ
४) साक्षी पवार ७ अ
५) सृष्टी चौधरी ७ अ

गट क्र.३ - १) कौस्तुभ जाधव ७ ब
२) साहिल उदुगडे ७ ब
३) यश कोल्हे ७ ब
४) शर्वरी शेडगे ७ ब
५) वेदांत मंगरुळे ७ ब

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन!

### शारदोत्सव

सोमवार दि. १९/१०/२०१५ शारदोत्सवानिमित्त 'पणती सजावट' ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ५ वी ते ७ वीच्या एकूण २५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन मोठ्या कल्पकतेने पणत्यांची सजावट केली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### बालगोपाळांची दहीहंडी - गणेशोत्सव

आपल्या भारतीय परंपरेनुसार साजरा होणाऱ्या सर्व सणांद्वारे समाजावर एक प्रकारचा संस्कार केला जातो.

सणांच्या निमित्ताने सर्वजण एकत्र येतात. एकमेकांना सहकार्य करतात आणि गुण्यागोविंदाने ठरवलेला कार्यक्रम पार पाडतात. यातूनच एकमेकांविषयी जिव्हाळा निर्माण होतो. सहकाराची वृत्ती वाढीस लागते. सर्वांनी एकत्र येऊन सण, उत्सव पार पाडणं हा संस्कार आपल्या भारतीय कुटुंबपद्धतीचा, संस्कृतीचा कणाच आहे!

आणि नेमका हाच धागा पकडून आपण शाळांमधून अशा प्रकारचे सण, उत्सव साजरे करतो. कारण संस्कारक्षम बालवयातच जर विचारांना योग्य दिशा मिळाली तर मुलांसाठी ती आयुष्यभराची शिदोरी असते. आमच्या सौ. आनंदीबाई के. जोशी शाळेतही आम्ही याच उद्दिष्टांना अनुसरून सण साजरे करतो.

शुक्रवार ४ सप्टेंबर २०१५ रोजी शाळेत 'दहीहंडी' सोहळा साजरा केला गेला. आधीच्या आठवड्यात मुलांना कृष्णाच्या विविध गोष्टी सांगितल्या होत्या, चित्रफिती दाखवल्या होत्या. त्यावर चित्रही काढून घेतली होती. मुलंही गोष्टीतील कृष्ण गोपिकांमध्ये इतकी एकरूप झाली होती की दहीहंडीच्या दिवशी स्वतःच कृष्ण, गोपिका होऊन आली होती.

शिक्षक आणि काकांनी सजवलेली दहीहंडी तळमजल्यावरील मोकळ्या जागेत मधोमध टांगली होती. अतिशय प्रसन्न आणि उत्साहाच्या वातावरणात, कृष्णाच्या गाण्यांच्या पार्श्वसंगीतावर नाचत नाचत मुलांनी एकमेकांच्या सहाय्याने आणि काकांच्या मार्गदर्शनाखाली एक छोटासा मनोरा रचून, बघता बघता टांगलेली दहीहंडी रिकामी केली. केळी, काकडी, दहीपोहे, साखर असा गोपाळकाल्याचा स्वादिष्ट प्रसाद मुलांनी मिटक्या मारत खाल्ला. यातूनच मुलं आपोआप शिकली की, कोणतीही गोष्ट एकमेकांच्या मदतीशिवाय आणि मोठ्यांच्या योग्य मार्गदर्शनाशिवाय पार पाडता येत नाही. तसंच सर्वांनी मिळून केलेला प्रसाद आणि सर्वांना एकाच प्रकारचा प्रसाद मिळाला यातून त्यांच्या मनात समतेचं बीज रोवलं गेलं.

प्रदूषण विरहीत उत्सव कसे साजरे करावेत याविषयी मुलांना योग्य वयातच योग्य माहिती मिळणं आताच्या काळात अत्यंत गरजेचं झालं आहे. आमच्या शाळेतही याचे योग्य भान राखून गणोशोत्सवाची आखणी केली. पाणी प्रदूषित कसं होतं? का होतं? याविषयी मुलांना माहिती देऊन त्या विषयीच्या ध्वनिफिती दाखवून मुलांबरोबर त्याविषयी चर्चा केली आणि शाडूच्याच मातीचा गणपती आपण का आणावा या विषयी एक प्रकारची जागरुकता त्यांच्या मनात निर्माण केली. तसंच गणपतीच्या मखराची सजावटही प्रदूषणास हानिकारक नसावी याविषयीही मुलांबरोबर चर्चा करण्यात आली आणि त्यानुसारच सजावट केली गेली.

मंगळवार १५ सप्टेबर २०१५ रोजी नवनवीन कपडे परिधान केलेल्या मुलांनी, मोरयाच्या गजरात रांगोळीने सजवलेल्या प्रवेशद्वारापाशी श्री गणेशाचे आनंदाच्या उत्साहाच्या वातावरणात स्वागत केले. त्यानंतर श्री गणेशाची पूजा व आरती हे सर्व यथासांग पार पडले. मुलांनीही गणपतीचे विविध श्लोक व गाणी म्हणून त्यांचा आनंद व्यक्त केला.

सर्वांनी प्रसाद ग्रहण केल्यावर आपापल्या वर्गात जाऊन शिक्षकांनी दिलेल्या चिकण मातीचे मोदक (छोटा शिशु) आणि शाडू मातीचे गणपती (मोठा शिशु) तयार केले आणि स्वनिर्मितीच्या आनंदात रममाण झाले. घरी गेल्यावर त्यावर रंगकाम करायचाही बेत मनातल्या मनात केला गेला.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ सप्टेंबर २०१५ रोजी सार्वजनिक पाणवठ्यावर गणपतींचे विसर्जन न करता घरातल्याच एखाद्या मोठ्या भांड्यात (बादलीत) विसर्जन का करायचे? त्यामुळे पर्यावरणाचा तोल कसा साधला जातो? तसेच ते पाणी घरातील झाडांच्या कुड्यांसाठी कसे वापरता येते? या सर्व गोष्टी समजून घेऊन मुलांनी शाळेतील श्री गणेशाचे विसर्जन केले.

---

हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

मुलांना ध्वनिप्रदूषणाचे दुष्पपरिणाम कोणते? व ते कसे टाळावेत या संबंधीही जागरूक करण्यात आलं.

तर असा हा संस्कारांचा खजिना लुटून मुलांनी हे दोन सण अत्यंत सजगतेनं साजरे केले!!

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**वाचन प्रेरणा दिन**

दि. १५ ऑक्टोबर २०१५ हा दिवस डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरा केला गेला.

या दिवसाची सुरुवात कलामांच्या पुस्तकांच्या परीक्षणावर आधारित व्याख्यानाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध लेखांचे वाचन केले. विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळावी यासाठी हलक्याफुलक्या पण संस्कारक्षम गोष्टींचे वाचन केले गेले.

या कार्यक्रमांतर्गत ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अब्दुल कलाम यांच्यावर दृकश्राव्य माध्यमाचा वापर करून हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये व्याख्यान आयोजित केले होते. कलामांचा जीवनपट छोट्या छोट्या गोष्टींमधून विद्यार्थ्यांसमोर उलगडला गेला. ज्यामधून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली.

इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी देखील शाळेच्या सभागृहात 'Good Manners and Respect' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. दृकश्राव्य माध्यमाच्या आधारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन या व्याख्यानाद्वारे केले गेले.

इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. कलामांवर आधारित एक छोटी चित्रफित दाखविली गेली. त्यांचे विचार या चित्रफितीमधून विद्यार्थ्यांना समजावून दिले गेले. याच चित्रफितीवर आधारित Quiz Competition विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली गेली होती. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. अचूक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांनी त्यांचा सहभाग नोंदविला.

शाळेच्या चौथ्या तासिकेमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'स्मार्ट ठाणे' या विषयावर निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा या उपक्रमाला उत्साही प्रतिसाद लाभला. ठाणे शहराचा विकास स्मार्ट शहराच्या दिशेने होण्यासाठी आवश्यक सूचना व इतर विचार विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधाद्वारे मांडले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ठाण्यातील प्रतिथयश लेखिका व कलाकार सौ. स्निग्धा सबनीस यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वाचन व त्याचे वेगवेगळे प्रकार छोट्या छोट्या उपक्रमांमधून समजावून सांगितले. शरीराची, मनाची व चित्रांची भाषा कशी वाचावी? त्याचप्रमाणे नाट्यवाचन कसे करावे? वाचन करताना शब्दांना अनुसरुन हावभाव, आवाजातील चढउतार यांचा मेळ कसा घालावा यावर अतिशय समर्पक व सोप्या पद्धतीने भाष्य केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करुन त्यांनी विषयाची उकल केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी संवाद साधून हा विषय समजावून घेतला.

याच विद्यार्थ्यांनी डॉ. कलामांवर आधारित चर्चा सत्रात भाग घेऊन शिक्षकांबरोबर संवाद साधला. कलामांच्या विचारांची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या संवाद व सहभागाने यशस्वी झाला.

५ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी 'वाचू आनंदे' या तासिकेअंतर्गत त्यांना आवडणाऱ्या पुस्तकांचा आस्वाद घेतला. तसेच 'पुस्तके तुमच्या भेटीला' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शाळेचे ग्रंथालय व तिथे आयोजित केलेल्या पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली. स्वतः पुस्तके हाताळून या विविध पुस्तकांचे वाचन केले. वाचनाचे महत्त्व सांगणाऱ्या निबंध व काव्य वाचनाचेही आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते.

पाठीवर पुस्तकांचे व वर्गात अभ्यासाचे ओझे नसल्यामुळे शाळेतील विद्यार्थी आनंदी दिसत होते. स्वतःच्या गोष्टींच्या पुस्तकांची देवाण घेवाण करून जास्तीत जास्त वेगवेगळ्या प्रकारच्या लेखांचा आस्वाद घेताना विद्यार्थी दिसत होते.

अशाप्रकारे विविध कृतीसत्रे, व्याख्याने, पुस्तक प्रदर्शन, लेखक व विद्यार्थी भेट, चर्चासत्र व संवाद कथाकथन व प्रश्नमंजुषा या उपक्रमांद्वारे वाचन प्रेरणा दिन शिक्षक व विद्यार्थ्यांनी साजरा केला. वाचन कट्टा या उपक्रमानुसार ग्रंथपालांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी 'Readers club' ची स्थापना केली गेली.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांचे एक पुस्तक वाचण्याचा संकल्प केला.

**२००४-२०१५ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकालः**

**राज्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांची नावे खालील प्रमाणे :**

१) कु. वत्सल गाला २) कु. हीर गाला

३) कु. श्रीपाद साळुंखे ४) कु. निमेष सियाल

५) कु. आर्य बउवा ६) कु. वेदांत काकडे

७) कु. सुबोध कदम

मराठी ग्रंथ संग्रहालयाने आयोजित केलेल्या 'अभिवाचन' स्पर्धेचे निकाल :

कु. मैत्रयी भारती हिला इंग्रजी वाचनात दुसरा तर कु. वैष्णवी यावगल हिला मराठी वाचनात दुसरा क्रमांक मिळाला.

**रोटरी क्लब आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे निकाल**

कु. अमय दानोले, कु. विभव कोदे व कु. ओंकार वरुडकर या आमच्या विद्यार्थ्यांनी कास्य पदक मिळवले.

आमच्या शाळेचे नाटुकल्याला 'बाप्पाच्या हातात मोबाईल' हा जिज्ञासा ट्रस्टने आयोजित केलेल्या स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळाले. सौ. वीणा जोशी ह्यांनी ही नाटुकले लिहीले व दिग्दर्शित केले होते.

भारत विकास परिषद तर्फे आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धा

या स्पर्धेत अमेय दानोळे व तरंग डोंगा या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

लायनेस् क्लब उपवन आयोजित हिंदी निबंध स्पर्धेत कु. इशिता सुळे हिने प्रथम क्रमांक पटकावला.

**स्त्री कल्याण संघटनेतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेचा निकाल**

१) इ. ५ वी - १० वी गट : ईशिता सुळे : दुसरा क्रमांक

२) इ. ९ वी - १० वी गट : अमेय दानोळे - प्रथम क्रमांक
वेदांत केळकर - दुसरा क्रमांक

३) इ. ७ वी - ८ वी गट : आदिती पेंडसे - दुसरा क्रमांक

**क्रिडा**

**बॅडमिंटन**

सतरा वर्षाखालील डी एस ओ स्पर्धेत आमच्या शलाका सहस्त्रबुद्धे, वैष्णवी घाग व व भूमिका पाध्ये ह्या विद्यार्थीनींच्या गटानी यश संपादन केले.

**जलतरण : डी एस ओ स्पर्धा**

१) ओंकार राऊत ह्याला मुंबई विभागात ५० मी. बॅक स्ट्रोक व १०० मी. फ्रीस्टाईल मध्ये कास्यपदक मिळाले व १४ वर्षाखालील गटात तीन सुवर्णपदक मिळाली.

२) राजेश्वर देसाई ह्याला १४ वर्षाखालील फ्रीस्टाईल गटात कास्यपदक मिळाले.

३) १४ वर्षाखालील गटात ४०० मी. फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक व २०० मी. व ४०० मी. रौप्यपदक मिळाले.

**स्केटिंग**

कनिष्का लाड हिला रोड रेस शॉर्ट व स्क्वॉड ॥ शॉर्ट या स्पर्धेत अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक मिळाले.

**टेबल टेनिस : डी एस ओ स्पर्धा**

आद्यश्री जोग व आर्चिस करमकर या दोघांनी एकत्रितपणे मानांकन मिळवले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**प्रबोधक आयोजित ठाणे जिल्हास्तरीय वक्तृत्त्व स्पर्धेची अंतिम फेरी संपन्न**

प्रबोधक, मुंबई तर्फे आयोजित ठाणे जिल्हास्तरीय वक्तृत्त्व स्पर्धेची अंतिम फेरी २४ सप्टेंबर २०१५ रोजी डोंबिवली येथील ब्राह्मण सेवा सभागृहात पार पडली. दोन प्राथमिक फेरी स्तरातून निवडलेल्या १० स्पर्धकांमध्ये ही स्पर्धा रंगली. म्हारळ गाव, कल्याण येथील ऋषीकेश बोडके याला प्रथम क्रमांकाचा सन्माननीय स्वामी विवेकानंद सन्मान (सन्मानपत्र आणि रुपये १०,०००/- रोख) तर ठाणे येथील जोशी बेडेकर महाविद्यालयाचा श्री. शुभम सरतापे याला द्वितीय क्रमांकाचा सन्माननीय स्वातंत्र्यवीर सावरकर सन्मान (रुपये ७०००/- आणि सन्मानपत्र) मिळाले. उत्तेजनार्थ पुरस्कार श्री. नितेश गावकर (जोशी बेडेकर) याला मिळाला. याशिवाय परीक्षकांनी अक्षय पाटील (बांदोडकर महाविद्यालय), ऋषिकेश मुळे (जोशी बेडेकर महाविद्यालय) आणि कुमारी निकिता टेंबे (आदर्श महाविद्यालय-बदलापूर) यांना ''परीक्षक सन्मान'' देण्यात आले. त्यांना श्री. विनोद मेस्त्री लिखित ''मला शिवाजी व्हायचंय'' हे पुस्तक बक्षिसरुपाने देण्यात आले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**वादविवाद स्पर्धा**

प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धा दि. १४ सप्टेंबर २०१५ रोजी घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व विद्यापीठ, राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे नेतृत्व करणारे विद्यार्थी मिळावेत हा ह्या स्पर्धेचा हेतू होता. स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे होते -

१. भारतातून फाशीची शिक्षा हद्दपार व्हावी का?

२. भारतीय तरुणांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना डावलली जात आहे का?

स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

रावदीप गांधी, नरेंद्र, मधुकर चव्हाण, किरण दुंबारे, हिमाली कुलकर्णी, रामरक्षा व्ही. सोनार, वैभव गालांडगेकर, स्वानंद गांगल, नीतिश झा, गांधी, कौशल, अवसारे अक्षयकुमार

सदर स्पर्धा ए. व्ही. रुममध्ये घेण्यात आली. ॲड. पायक, प्रा. बनसोडे, प्रा. हजरा (महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी) ह्यांनी परिक्षकाची भूमिका पार पाडली. श्री. नीतिश झा (प्रथम), श्री. स्वानंद गांगल (द्वितीय) व कुमारी रामरक्षा सोनार (तृतीय) ह्या विद्यार्थ्यांनी बक्षीसे पटकाविली. उत्तेजनार्थ बक्षीस श्री. वैभव गालांडेकर ह्यांना देण्यात आले.

**वक्तृत्व स्पर्धा**

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिवसाचे औचित्य साधून दि. १५ सप्टेंबर २०१५ रोजी ''माझा भारत माझी लोकशाही'' ह्या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ॲड. डिसुजा व ॲड. गांधी ह्यांनी

---

माणसाने आपल्या आयुष्यात सुख-दुःख, मानापमान, स्फूर्ती-निंदा, लाभ-हानी, प्रिय-अप्रिय ह्या गोष्टी समान समजाव्यात.

परिक्षकाची भूमिका पार पाडली. स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली होती. एकूण तेरा विद्यार्थ्यांनी ह्यात सहभाग घेतला व खालील विद्यार्थी विजेते म्हणून घोषित करण्यात आले.

१. ब्रह्मा गुरपीत

२. अक्षयकुमार अवसारे

३. गायत्री हलदावणकर

४. वैभव गालाडेकर

५. रामरक्षा सोनार

महाविद्यालयातील द्वितीय विधीच्या विद्यार्थ्यांची ''अशिलांची मुलाखत'' ही प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २९ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. सदर परीक्षा ही महत्त्वपूर्ण असून पुढील सत्रासाठी तिच्यात उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

तृतीय विधी विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक परीक्षेचा भाग म्हणून ''अभिरूप न्यायालय'' ही परीक्षा दिनांक ३० सप्टेंबर रोजी पार पाडली.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. इंजिनियर सर यांचे दिनांक २२ सप्टेंबर २०१५ रोजी निधन झाले. महाविद्यालयामध्ये दिनांक २६ सप्टेंबर रोजी श्रद्धांजली वाहण्यात आली. पी. ई. एम. विधी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या "Mock Trial and Judgement writing" या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे तृतीय विधी कु. अपुवी पाठक व सुशिल यादव यांनी सहभाग घेतला. सदर स्पर्धा दिनांक १७ सप्टेंबर २०१५ रोजी पार पडली.

के. सी. विधी महाविद्यालय मुंबई यांनी दिनांक १२ सप्टेंबर २०१५ रोजी 'अशिलाची मुलाखत' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी तृतीय विधीचे सुधांशु सिंग व द्वितीय विधीच्या कु. अंकिता मुखर्जी यांनी सहभाग घेतला.

**प्रथम वर्ष विधी मूट कोर्ट स्पर्धा**

दिनांक ३ ऑक्टोंबर, २०१५ रोजी प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचे स्वरुप खालील प्रमाणे होते.

दिनांक : ३ ऑक्टोंबर, २०१५

परिक्षक : श्री. एस. एम. पायक आणि<br>
श्री. मनोज पी. भट

केस : रिट्रीचमेंट ॲण्ड अनफेअर प्रॅक्टीसेस

सहभागित विद्यार्थी : एकूण-१८ मुले-८ मुली-६

सर्वोत्कृष्ठ मुटर : १) श्री. अक्षय सिक्वेरिया<br>
२) श्री. देवेंद्र जैन<br>
३) श्री. श्याम ठाकुर

उत्कृष्ठ मेमोरियल : १) श्री. अक्षय सिक्वेरिया<br>
२) श्री. देवेंद्र जैन<br>
३) श्री. श्याम ठाकुर

उत्तेजनार्थ : श्री. वैभव

तरुण मुटर : अनुपा सहानी

**मराठी मूटकोर्ट स्पर्धा**

मराठी मूटकोर्ट स्पर्धा दि. १३ ऑक्टोंबर २०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचे स्वरुप खालील प्रमाणे होते.

दिनांक : १३ ऑक्टोंबर, २०१५

परिक्षक : श्री. विनोद वाघ व श्री. प्रॉस्पट डीसूझा

केस : सिवील सूट फॉर मेलिशियस प्रॉसीक्यूशन,<br>
डिफ्रमेशन इत्यादी

सहभागित विद्यार्थी : २ मुले/ १ मुलगी

विजेते विद्यार्थी : १) मैथीली खामकर<br>
२) सदानंद पाटील<br>
३) महेश वाघमारे

**ID, DHE Inspection**

सहसंचालक कार्यालयाच्या प्रतिनिधी श्रीमती सुनिता लोंढे (प्राध्यापक, पनवेल महाविद्यालय) ह्यांनी दि. १२ ऑक्टोबर २०१५ रोजी विद्यार्थी संख्येची पडताळणी करण्यासाठी महाविद्यालयास भेट दिली. त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांची मोजदात केली. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गाचे एकूण ४८१ विद्यार्थी त्या दिवशी उपस्थित होते. ह्या सर्व कार्यक्रमामध्ये प्राध्यापक विनोद वाघ ह्यांनी त्यांना सहकार्य केले.

**विशेष व्याख्यान वर्ग**

प्रथम वर्ष विधीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विशेष व्याख्यान वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सदर वर्ग दि. २७ ऑक्टोंबर पर्यंत चालू होते.

| Date | Teacher | Topic |
|---|---|---|
| 2nd Oct, 2015<br>(11.00 am to 1.30 pm Sunday) | Mr. Majoj Bhatt | Negligence |
| 4th Oct, 2015<br>(11.00 am to 1.30 pm Sunday)<br>11th Oct, 2015<br>(11.00 am to 1.30 pm)<br>(2.30 pm to 4.30 pm) | Mr. Majoj Bhatt<br>Mr. Majoj Bhatt<br>Mr. M. D. Joshi | Nuisance<br>Torts against person and property (assault bating, FI, Trespass, Conversion)<br>IDA |
| 12th Oct, 2015 | Mr. Arun Jalisatgi | Labour - MRTU PULP (5.30 am to 9.00 pm) |
| 14th Oct, 2015 | Mr. V. H. Wagh | Legal Language |
| 15th Oct, 2015 | Mr. V. H. Wagh | Legal Language |
| 16th Oct, 2015 | Mr. Mithun Bansode | Contract-Performance and Breach |
| 17th Oct, 2015 | Mr. V. H. Wagh | Torts-General Defences, Vicarious liability |
| 18th Oct, 2015<br>(10.30 am to 1.30 pm Sunday)<br>(2.30 pm to 4.30 pm) | Mr. Majoj Bhatt<br>Mr. M. D. Joshi | Torts-Defomations and malicious Prosecution<br>Employee Compensation Act. |
| 19th Oct, 2015 | Mr. V. H. Wagh | Torts-Iraud, Conspiracy, Passing off, Negligent Misstatement |
| 20th Oct, 2015 | Dn. Gandhi | Labour Law |
| 21th Oct, 2015 | Mr. Ganesh Badri | Specific performance and recegsion |
| 23rd Oct, 2015 | Mr. Majoj Bhatt | Torts |
| 24th Oct, 2015 | Mr. Amber Joshi | Invalid Contacts illegal, void, voidable |
| 26th Oct, 2015 | Mr. Srividhya J &<br>Mr. I. A. Shaikh | Legal Language |
| 27th Oct, 2015 | Mrs. Srividhya J. | English |

तन्मयता नसेल तर विद्वत्ता व्यर्थ आहे.

तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मराठी वर्ग चालविण्यात आले. त्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे होते.

| दिनांक | शिक्षक | विषय |
|---|---|---|
| २८ ऑक्टोबर, २०१५ | श्री. अंबर जोशी | दिवाणी प्रक्रिया संहिता |
| २९ ऑक्टोबर, २०१५ | श्री. अंबर जोशी | फौजदारी प्रक्रिया संहिता |
| ३० ऑक्टोबर २०१५ | श्री. अरुण गायकवाड | आंतरराष्ट्रीय कायदा व मानव अधिकार कायदा |
| ३१ ऑक्टोबर, २०१५ | डॉ. महेश बर्वे | कायद्याचे स्पष्टीकरण |

**दक्षता जाणीव सप्ताह २६ ऑक्टोबर, २०१५**

राष्ट्रीय दक्षता विभागातर्फे २६ ऑक्टोबर, २०१५ ते ३० ऑक्टोबर २०१५ हा दक्षता जाणीव सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. 'प्रीवेनशन विजीलन्स ॲन अ टूल ऑफ गूड गव्हर्नन्स' हा ह्या वर्षीच्या कार्यक्रमाचा मुख्य विषय होता. आमचे महाविद्यालय तसेच देना बँक तर्फे एकत्रितरित्या निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते.

१. वॉर अगेंस्ट करप्शन इज द मदर ऑफ ऑल वॉरस्

२. रोल ऑफ RTI इन मेकिंग इंडिया करप्शन फ्री

३ सिग्निफिकन्स ऑफ व्हिस्टल ब्लॉवरुप प्रोटेक्शन इन कमबॅटिंग करप्शन

४. कोड ऑफ एशिक फॉर परसन्स इन पब्लिक सर्व्हिस्

५. कनव्हेनशन अगेंस्ट करप्शन

दिनांक २६ ऑक्टोबर रोजी देना बँक तर्फे देण्यात येणारी रोख रक्कम बक्षीस, देना बँकेचे ठाणे विभागाचे व्यवस्थापक राधाकृष्णमूर्ती ह्यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच भारताला भ्रष्टाचार मुक्त करण्याचे आव्हान देखील विद्यार्थ्यांपुढे ठेवण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी दक्षता विभागाचे अधिकारी सुरेश एम. जाधव व देना बँक ठाणे व्यवस्थापक लहू सावंत उपस्थित होते.

सदर स्पर्धेची पारितोषिके खालील विद्यार्थ्यांनी मिळवली.

प्रथम - हेमाली पाटील

द्वितीय - अर्चना कदम व अंकिता मुखर्जी

तृतीय - राहुल कारांडे

सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार ह्यांनी सदर कार्यक्रमाचे नियोजन करणे, प्रशस्तिपत्रक तयार करणे इ. कामांमध्ये व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

**विद्यापीठ परीक्षा**

दिनांक २७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर पर्यंत Sem-I आणि Sem-IV च्या परीक्षा चालू होत्या. आमचे महाविद्यालय हे सदर परिक्षेचे केंद्र होते.

**महाविद्यालय सराव परीक्षा**

महाविद्यालयातर्फे सराव परीक्षा घेण्यात आल्या. त्याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे.

| Date | I year / Sem-I | II year / Sem-III | III year / Sem-V |
|---|---|---|---|
| 15-10-15 | | Administrative Law | CPC |
| 16-10-15 | | Transfer of Property | Cr. PC. |
| 17-10-15 | | Company Law | IOS |
| 19-10-15 | | Family-II | PIL & HRs |
| 20-10-15 | Labour Law : Mr. M. D. Joshi | | |
| 21-10-15 | Tort : Mr. Manoj Bhatt | | |
| 23-10-15 | Contract-I : Mr. Ganesh Badri | | |
| 26-10-15 | Legal Language : Mr. I. A. Shaikh | | |

**राष्ट्रीय एकात्मता दिवस ३१ ऑक्टोबर, २०१५**

३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने 'राष्ट्रीय एकात्मता दिवस' साजरा करण्यात आला. विशेष वर्ग, ग्रंथालय व कार्यालयात राष्ट्रीय एकात्मतेचे संरक्षण करण्यासाठी शपथ देण्यात आली. कै. सरदार वल्लभभाई पटेल यांनी श्रद्धांजली वाहण्यात आली.

**आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग**

वरील उपक्रमांतर्गत महाविद्यालयातर्फे एकूण ६८ विद्यार्थ्यांची नावे विद्यापीठाकडे देण्यात आली आहेत.

दिनांक १९ ऑक्टोंबर ते २७ नोव्हेंबर ह्या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाकरिता ग्रंथालयाची वेळ सकाळी १० ते रात्री ९ वा. पर्यंत करण्यात आली आहे.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**राष्ट्रीय विपणन संमेलन २०१५ (NATIONAL MARKETING SUMMIT 2015)**

**Axiom a path to Every where**

डॉ. व्ही .एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे तर्फे पाणिनी सभागृह येथे दिनांक २६-०९-२०१५ रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यावसाईक कौशल्याचा विकास व्हावा या उद्देशाने Axiom a path to Every where या विषय सूत्रावर आधारित राष्ट्रीय विपणन संमेलन २०१५ चे आयोजन करण्यात आले. सम्मेलनाची सुरुवात डॉ . नितीन जोशी (Director, DR V N BRIMS) यांच्या उद्घाटनपर भाषणाने झाली. आजच्या काळातील विपणन क्षेत्रातील बदलत्या संकल्पना आणि कोणत्याही उद्योगात विपणनाचे महत्त्व विषद करून त्यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले .



कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रमुख अतिथी डॉ. हरीश कुमार पुरोहित (Director, PTVA's Institute of Management Studies) यांनी आपल्या बीजभाषणात विपणन क्षेत्रात निर्माण झालेल्या नवनवीन संकल्पना / प्रवाह आणि त्याचे उद्योग क्षेत्रामध्ये झालेले

संकटसमयी मूर्ख लोक ज्योतिषाकडे धावतात; तर शहाणे लोक आपल्या बुद्धीचातुर्याच्या व शक्तीच्या जोरावर संकटाशी सामना करतात. - पंडित जवाहरलाल नेहरू

आश्चर्यकारक बदल या बाबत अनेक उदाहरणे देऊन याविषयावर आपले मत मांडले.

संमेलनाच्या पुढील भागात औद्योगिक क्षेत्रात विपणनाचे महत्त्व या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले; यामध्ये

अजिताभ दत्ता (CEO, Simplicity Communications)

सागर नरसिंहन (CEO, Automatrix Automotive Pvt. Ltd.)

राम मनोहर राव (Vice President, TNS)

रजित देसाई (Principal Partner at m/SIX, Mind Share)

डॉ. सत्विन्दरसिंग बेदी (Associate Professor DR.V.N.BRIMS )

आणि निलय पाटील (Dy. General Manager Indian Express Group) अशा विविध औद्योगिक क्षेत्रातील विपणनतज्ज्ञांनी सहभाग घेतला. परिसंवादा मध्ये प्रामुख्याने Hospital Industry (आरोग्य सेवाक्षेत्र), B 2 B Industry, Mass Media Industry, Digital Marketing Industry या उद्योग क्षेत्रात झालेले प्रमुख बदल, ग्राहकांच्या अपेक्षा समजून घेण्यासाठी केले गेलेले विपणन सर्वेक्षण / संशोधन, त्यानुसार केल्या गेलेल्या उपाय योजना, आखल्या गेलेल्या व्यूहरचना आणि त्याची अंमलबजावणी इत्यादी संदर्भात सर्व तज्ज्ञांनी आपल्या अनुभवांचे कथन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .

संमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्थापकीय कौशल्य, सृजनशीलता, नावीन्यता यासारख्या गुणांना वाव देण्याच्या उदेशाने Scrapbook making, Creating a new product, Treasure Hunt, बोधचिन्ह स्पर्धा, जाहिरात कला स्पर्धा, प्रश्नमंजुषा, फुटबॉल सामना इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या या सर्व स्पर्धांचे नियोजन आणि आयोजन द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले व प्रथम




वर्षाचे विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाल्याने सर्वच विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला. संमेलनाच्या शेवटच्या सत्रात स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

संमेलनासाठी Essel world, oppo smart phone, आणि cafe wee wee यांचे प्रायोजक म्हणून सहकार्य मिळाले. डॉ. शीतल पाटील (Asstt. Professor DR.V.N.BRIMS ) यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने संमेलनाची सांगता झाली.

या संमेलनाद्वारे विद्यार्थ्यांना प्रसिद्ध उद्योग व्यवसायातील तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तींसमोर आपले कौशल्य सादर करण्याची तसेच या तज्ज्ञ मंडळींकडून विपणन क्षेत्रातील विविध पैलूंबाबत खूप काही शिकण्याची संधी देखील मिळाली.

### ग्रंथोत्सव २०१५ - नाते जोडूया पुस्तकांशी

डॉ. व्ही .एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थे तर्फे ग्रंथांचे महत्त्व आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने दिनांक ७ -१०-२०१५ आणि ८-१०-२०१५ या दोन दिवशी पाणिनी सभागृहात सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत 'ग्रंथोत्सव' २०१५ चे आयोजन करण्यात आले.

डॉ. व्ही. एन. ब्रीम्सचे ग्रंथपाल संजय सपकाळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि डॉ. नितीन जोशी यांनी

या कार्यक्रमा बद्दल आपले मनोगत व्यक्त करून प्रमुख पाहुण्यांचे व सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर भाषणात ग्रंथ आणि ग्रंथालयाचे महत्त्व विषद करून ग्रंथालय हा प्रत्येक महाविद्यालयाचा आत्मा असतो आणि ग्रंथ / पुस्तक वाचणे हा प्रत्येक विद्यार्थी आणि शिक्षकांचा धर्म असला पाहिजे असे त्यांनी सांगितले आणि म्हणूनच विद्यार्थ्यांनी पुस्तकाची रोज किमान दोन तरी पाने वाचली पाहिजेत असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.



या प्रदर्शनामध्ये इंग्रजी, मराठी भाषेतील व्यवस्थापन अभ्यास क्रमाशी संबंधित; विपणन व्यवस्थापन, प्रचालन व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, संघटन व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन, ज्ञान व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास व मार्गदर्शन इत्यादी विषयांची तसेच व्यवस्थापन क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या व विषयाला पूरक अशा विविध विषयांच्या पुस्तकांचा समावेश होता.

यामध्ये Pearson Education, PHI learning, Mc Graw Hill India, S. Chand, Wiley india, Jaico, Vikas, AMACOM, Cengage Learning, HBR Press, Harper Collins, Oxford इत्यादी प्रसिद्ध प्रकाशकांच्या पुस्तकांचा समावेश होता.



विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सानिध्यात रमावे, नवी कोरी पुस्तके त्यांना हाताळायला मिळावीत आणि वाचनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी व त्या अनुषंगाने संस्थेतील शैक्षणिक वातावरणनिर्मितीस साथ मिळावी, विद्यार्थी तसेच सर्वच वाचकांना मान्यवर, प्रसिद्ध अशा विविध लेखकांच्या नवनवीन कलाकृतींची माहिती मिळावी या उद्देशाने आयोजित केलेल्या या प्रदर्शनाला ज्ञानद्वीप महाविद्यालय संकुलातील अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी भेट दिली व कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

**राष्ट्रीय वित्त संमेलन २०१५ (दिनांक : १०-१०-२०१५)**
**वित्त बाजारावर अर्थव्यवस्थेचा प्रभाव**

जागतिक बाजारपेठेत स्पर्धक म्हणून भूमिका बजावत असल्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था सध्या आमूलाग्र परिवर्तन अनुभवत आहे. भारतीय अर्थव्यवस्था; निश्चित दिशेने आणि ठराविक दराने होणारी वार्षिक आर्थिक वाढ, थेट विदेशी गुंतवणुकीत होणारी वाढ, भांडवली बाजारातील फुगवटा, अशा मार्गाने प्रवास करत असतानाच वित्तीय बाजारामध्ये गुंतवणूकदार सध्या अत्यंत जटील आणि अंतरबद्ध अशा समस्यांना तोंड देत आहेत; जसे equity च्या मार्गाने निश्चित उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करून वित्तीय सुरक्षा साध्य करण्याचा प्रयत्न, रिझर्व बँकेने केलेली व्याज दरातील कपात, तेलाच्या किंमती मधील अस्थिरता आणि उत्पादक/उत्पादना मधील प्रचंड स्पर्धा. व्याज दरामध्ये झालेल्या बदलाचा प्रभाव विशेषतः

विमाक्षेत्र आणि निवृत्ती वेतन निधी क्षेत्रावर पडणार असल्याने मालमत्ता व्यवस्थापकांसाठी व्याजदरातील बदल हे मोठे आव्हान असणार आहे. गुंतवणूकदारांना देखील चपळतेने निर्णय घेऊन अशा अस्थिर परिस्थितीत जुळवून घ्यावे लागणार आहे.

भारतीय वित्तीय क्षेत्रातील या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमी संबंधात विचारमंथन व्हावे यानिमित्ताने डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे 'वित्त बाजारावर अर्थव्यवस्थेचा प्रभाव' या विषयावर आधारित राष्ट्रीय वित्त संमेलन २०१५ चे आयोजन करण्यात आले. कारण अशाप्रकारची संमेलने शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक संस्था यांच्यातील परस्पर संबध प्रस्थापित होण्यासाठी एक चांगले व्यासपीठ आहे आणि सतत बदलत असणाऱ्या आजच्या आर्थिक आणि औद्योगिक परिस्थितीत तर अशा चर्चासत्रांकडे अधिक लक्ष वेधणे उपयुक्त ठरते / विचार मंथन कार्यक्रमाचे महत्त्व अधिक असते.

संमेलनाची सुरुवात डॉ. नितीन जोशी (संचालक, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांच्या उद्‌घाटनपर भाषणाने झाली. संमेलनाच्या माध्यमातून आपले ज्ञान आणि कौशल्य वाढवण्याचा प्रयत्न विद्यार्थांनी करावा असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी देखील रोजगार संधीसाठी उपयुक्त ठरणारी ज्ञान कौशल्ये आमच्या विद्यार्थी आणि शिक्षकांना समजावून सांगावीत असे आवाहन निमंत्रित तज्ज्ञांना केले.

त्यानंतर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सर संचालक, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांनी, 'भारतीय अर्थ व्यवस्थेची वर्तमान स्थिती आणि जागतिक बाजारपेठ' या संदर्भात सादरीकरण करून आपली मते मांडली .

संमेलनाचे प्रमुख अतिथी शामल गुप्ता (Director - Agriculture services, South Asia) यांनी वित्त बाजारातील मूलभुत संकल्पनांचे महत्त्व स्पष्ट करून वित्तीय क्षेत्रातील Desire, Expectation, Fear, Greed, behavioral Economics, disconnect in investment market structure, Angel / seed capital इत्यादी संकल्पना संदर्भात महत्त्वपूर्ण माहिती सांगितली.

सकाळच्या प्रेरणादायी व्याख्यानसत्रानंतर संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या मध्ये वित्त क्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी सहभाग घेतला. परिसंवादाचे सूत्र-संचालन आमच्या संस्थेतील सहा. प्रा. समीर साखरकर यांनी केले.

या परिसंवादात अमित त्रिवेदी (Owner, Karmayog Knowledge Academy) यांनी Mutual Fund, तेलाच्या किंमती आणि चलन दर यातील अस्थिरता, जोखीम व्यवस्थापन इत्यादी मुद्दे उदाहरणांचे दाखले देऊन स्पष्ट केले.

श्रीकांत शेट्टी (C.A.-vice president, advisors at Motilal Oswal securities) यांनी, 'अर्थव्यवस्थेतील बदलांचा वित्त बाजारावर होणारा परिणाम' याविषयावर आपली मते मांडली आणि विद्यार्थांच्या गुंतवणूक संदर्भातील अनेक प्रश्नांना उत्तरे दिली.

जितेंद्र कुमार (Member of faculty, NISM² an educational initiative of SEBI ) यांनी मुख्यत्वे 'वित्त बाजारातील SEBI चे कार्य आणि भूमिका , SEBI आणि FMC विलिनीकरण', या विषयावर विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.

गौरव कपूर (Head Business Development of western region) यांनी 'वित्त बाजारातील NSE चे महत्त्व', तसेच 'भारतीय रोखे बाजारातील व्यवहार' या संदर्भात चर्चा केली. आणि एकूणच या परिसंवादातून विद्यार्थ्यांना भारतीय वित्त व्यवहार, अर्थव्यवस्था त्यांची सद्यस्थिती, संकल्पना आणि त्यांचा भविष्यातील परिणामांचा वेध इत्यादी विषयांवर महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

संमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये 1 p.m. question, finance quiz, World business housee, Beg Borrow Steal, Role Play इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. संमेलनाच्या शेवटच्या सत्रात स्पर्धातील विजेत्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.  आणि डॉ. स्मिता जपे (सहा. प्रा. डॉ. व्ही.एन. ब्रीम्स) यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने संमेलनाची सांगता करण्यात आली.

**मानव सं-साधन संमेलन २०१५ (HR SUMMIT 2015)**

दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ या दिवशी डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणेतर्फे "HR- Leading the wave of Change" या विषयावर आधारित मानव सं-साधन संमेलन २०१५ चे आयोजन करण्यात आले.



जागतिकीकरण आणि झपाट्याने विकसित होणाऱ्या आजच्या तंत्रज्ञान युगात मानव सं-साधन विभागाची / क्षेत्राची भूमिकाही उत्क्रांत होत आहे. कर्मचारी ते मानव सं-साधन या संज्ञेचा झालेला प्रवास हा उद्योगांच्या व्यवस्थापकीय व्यूहरचनेमध्ये आणि व्यवस्थापकीय निर्णय प्रक्रियेत मानव सं-साधन विभागाचा सहभागाचे महत्त्व निर्माण झाल्यामुळेच  झालेला आहे. औद्योगिक क्षेत्रात झालेले हे परिवर्तन खूपच आव्हानात्मक आहे आणि  मानव सं-साधन विभागाला या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी नवनवीन मार्ग शोधणे आवश्यक आहे. बदलाचे व्यवस्थापन म्हणजे मुळात मानसिकतेत बदल करून, धोरणात्मक बदल करून उद्योग व्यवस्थेच्या हाताळणी मध्ये बदल करणे. या बदलाच्या काळात मानव सं-साधन विभागासमोरचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे कुशल मनुष्य बळ टिकवून ठेवणे आणि कामगिरीचे व्यवस्थापन करणे. विशेषतः जेव्हा उद्योग संस्था स्वतःचा नफा आणि बाजारातील स्थान टिकवण्यासाठी संघर्ष करत आहेत. लोकांच्या स्वतःच्या अशा काही शंका, गृहीतके, असतात; त्यांना स्वतःची काही आव्हाने किंवा आकांक्षा असतात आणि मानव सं-साधन व्यवस्थापन हे उद्योग संस्थांच्या अपेक्षां पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून ही बदल / परिवर्तन व्यवस्थापनाची प्रक्रिया हाताळणे यांच्याशी संबंधित असते.

संमेलनाच्या या विषयसूत्रावर भाष्य करून डॉ. नितीन जोशी यांनी उद्घाटन भाषण सादर केले आणि अंकिती करणाच्या (digitization) या काळात आमच्या विद्यार्थ्यांनी कोणते शैक्षणिक कौशल्य आत्मसात केले पाहिजे की जेणे करून ते रोजगार संधी साठी तयार होतील या बाबत मार्गदर्शन करावे अशी विनंती त्यांनी निमंत्रित तज्ज्ञ वक्त्यांना केली.

संमेलनाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी विषयसूत्रा वर आधारित अशा विविध मुद्यांवर सादरीकरण केले. ज्यामध्ये उद्योग क्षेत्रातील नवनवीन बदलते प्रवाह कौशल्य, व्यवस्थापन, मानव सं-साधन व्यवस्थापन विभागाचे उद्योगांच्या पुनर्रचनेतील योगदान इत्यादींचा समावेश होता.

संमेलनातील दुसऱ्या सत्रात संमेलनाच्या विषयावर आधारित एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मानव सं-साधन क्षेत्रातील विविध तज्ज्ञ मंडळींनी सहभाग घेतला. परिसंवादाचे नियंत्रण सहा. प्राध्यापिका कांचन अक्षय  यांनी  केले.

अजित सिंग (-Associate Vice- President and Head-Talent Management,Netmagic Solutions Pvt Ltd.) यांनी जागतिक बाजारपेठेत भारतीयांचा सहभाग/

वावर आणि विविधतेचे / भिन्नतेचे व्यवस्थापन; मानव सं-साधन क्षेत्रातील महत्त्वाचे तंत्र या विषयावर भाष्य केले.

प्रवीण सावंत (Vice President - Human Resources, Financial Technologies India) यांनी माहिती तंत्रज्ञान संबंधी कौशल्ये आज उमेदवार निवडीच्या कसोटीत किती अत्यावश्यक आहेत किंबहुना ती नसतील तर तुम्ही कसे अप्रचलित ठरता किवा तुम्ही कसे वगळले जाता याबद्दल माहिती सांगितली. तसेच आभासी बैठक किंवा वर्ग आजकाल जे अनेक ठिकाणी होत आहेत, उद्याच्या मानव सं-साधन क्षेत्रात ही नित्याची बाबा ठरणार आहेत.

श्रीमती पूनम अगरवाल (Head of HR ACG Worldwide) यांनी सांगितले की, मानव सं-साधनाचे क्षेत्रा मध्ये मार्मिक सांस्कृतिक व्यवहार अपेक्षित असतात. तसेच कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी पात्रता विकास देखील महत्त्वाची असतो.

रवींद्र पंडित (Head-HR, Chembond Chemicals) यांनी श्रमिक / कामगार ते मानव सं-साधन असा या संज्ञेचा बदललेला दृष्टीकोन या विषायावर आपले विचार मांडले व सतत शिकत राहणे नेहमी चांगले असते असा सल्ला त्यांनी दिला.

अजय नायर (Chief Administrative Officer, Housing.com) यांनी मानव सं-साधन व्यवस्थापन क्षेत्रात एकंदरीत उद्योग/ व्यवसायाची समज असणे कसे आवश्यक आहे, त्याचबरोबर मानव सं-साधनावर केलेली गुंतवणूक आणि त्यावर मिळणारा परतावा याचे महत्त्व देखील समजावून सांगितले. तसेच digitization किंवा अंकितीकारणावर आपले मत मांडताना त्यांनी सांगितले की, या सर्व IT आणि Data base किंवा माहितीचा विश्लेषणासाठी खूपच फायदा होतो आणि त्यानुसार कर्मचाऱ्यांचे मानस, त्यांची कामगिरी, सामातोलीत कार्य संस्कृती या बाबतीत निर्णय घेणे सोयीचे ठरते .

एकूणच परिसंवादात झालेल्या विचार मंथनामध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा झाली.

- नाविन्यतेला आजच्या उद्योग क्षेत्रात प्रोत्साहन दिलेच पाहिजे.
- नेहमीच बलवान आणि जलद असणारेच टिकून राहतात असे नाही; तर प्रसंगी परिस्थितीशी योग्य प्रकारे जुळवून घेवून सहज तरून जाणारेही टिकून राहू शकतात.
- दोन्ही बाजूंनी बांधिलकी असलेले प्रारूप यशाच्या सुनिश्चितते साठी उपयोगी ठरते.

  प्रत्यक्ष अनुभव घेणे हे प्रशिक्षणा इतकेच महत्त्वाचे असते.
- तरुण कनिष्ट कर्मचारी ज्यांच्याकडे नवनवीन कल्पना असतात, जे वेगळा विचार करतात त्यांच्या कडून अनुभवी कर्मचाऱ्यांना देखील शिकता येते.

संमेलनाच्या निमित्ताने MMS अभ्यास क्रमाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी Blind Train, Lateral Puzzles आणि Being Human अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते व प्रथम वर्षाचे विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाल्याने सर्वच विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला. संमेलनाच्या शेवटच्या सत्रात स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

समीर साखरकर (सहा. प्रा. डॉ. व्ही. एन. ब्रीम्स आणि Head of Placements- Dr. V.N.BRIMS) यांनी आभार प्रदर्शन केले आणि संमेलनाची सांगता करण्यात आली.

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***

**०२२-२५४२ ६२७०**

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

मॅक्समुलरने सांगितलेले शाळेबाहेरील शिक्षणाचे सर्व स्रोत आपण आज प्रदुषित करून टाकले आहेत. या सगळ्याच माध्यमांनी आपली 'निरागसता' हरवून ती व्यापाराची केंद्रे झाली आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये आज अपवाद वगळता,अनुकरणीय अशा चारित्र्यशील नेतृत्वाची दिवाळखोरी आहे.

व्यक्तिमत्त्वाच्या विकासामध्ये माहिती इतकेच महत्त्व त्याच्या नैतिक विकासाला असते. 'नैतिक' चौकटीशिवाय मिळणारी माहिती ही समाजाला 'धोकादायक' असते. ही 'नैतिक चौकट' प्रामुख्याने कुटुंबात आणि मग समाजातील अनुभवांतून विकसित होत असते. 'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचारा'मधील फरक असतो तो फक्त जबाबदारीच्या जाणिवेचा. रस्त्यावरून चालताना हातपाय कसेही हालवण्याचे स्वातंत्र्य असले, तरी दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करण्याकरता आपल्या हातापायांच्या हालचाली या नियंत्रितच कराव्या लागतात. स्वातंत्र्य आहे म्हणून वेडेवाकडे हातपाय हलवून चालत नाही. जबाबदारीनेच पाऊले टाकावी लागतात. हा स्वतःच्या स्वातंत्र्याचा संकोच नसतो, तर तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर असतो. ही 'जाणीव' जी प्रक्रिया देते किंवा शिकवते ते 'शिक्षण' असते. दैनंदिन जीवनामध्ये अशा शेकड्यांनी घटना घडत असतात. यातल्या अनेक घटना या परस्परावलंबी असतात. 'सारासार विचार' म्हणजे 'विवेका'नीच अशावेळी निर्णय घ्यायचे असतात. आपण 'एकटे' असतांना जसे वागतो, तेच आपलं खरं 'व्यक्तिमत्त्व' असतं. शिक्षणानी प्रामुख्याने विकास करायचा असतो तो या एकटेपणी असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा. दुर्दैवाने आजच्या शैक्षणिक धोरणांच्या पाऊसामध्ये याचा लवलेशही दिसत नाही.

'स्वातंत्र्य' हा जन्मसिद्ध हक्क आहे. तो कुठल्याही घटनेच्या कलमामुळे आपल्याला मिळत नसतो. शैक्षणिक धोरण म्हणजे जास्तीत जास्त 'नियंत्रण', हा विचार आता इतक दृढ झाला आहे की, त्यामुळे या प्रक्रियेतील सर्वच घटकांनी आपली 'स्वायत्तता' हरवली आहे. मग प्रवेश असो, शैक्षणिक शुल्क असो, परीक्षा असोत की अभ्यासक्रम असोत, सगळ्यांवर नियंत्रणं. वास्तविक भारताच्या सर्वोच्च न्यायालयानी, टी. एम. ए. पै फाऊंडेशन आणि कर्नाटक राज्य यांच्या संदर्भात निर्णय देतांना यातल्या प्रत्येक घटकांच्या स्वातंत्र्याचा ऊहापोह करून, नियंत्रणापेक्षा 'स्वायत्तते'कडे झुकणारा निर्णय दिला आहे. यानंतरही यासंदर्भातल्या अनेक न्यायालयीन निर्णयांतूनही शैक्षणिक संस्थांच्या स्वायत्ततेबद्दल 'विवेकी' मार्गदर्शन करण्यात आले आहे. या सर्व न्यायालयीन निर्णयाची माहिती सार्वत्रिक व्हावी म्हणून 'विद्या प्रसारक मंडळा'ने २००६ साली एक पुस्तिकाही प्रकाशित केली आहे. (http//www.vpmthane.org या संकेतस्थळावर ती उपलब्ध आहे.) अर्थातच कुठल्याच 'राजकीय' पक्षाला प्रामाणिकपणे ही स्वायत्तता असावी असे वाटताना दिसत नाही. हीच आजच्या शिक्षणाची खरी 'शोकांतिका' आहे.

भारताला एक महासत्ता बनवायचे असेल, तर अशा 'स्वायत्त' संस्थांची निर्मिती ही 'अपरिहार्य' आहे. आपली विद्यापीठे काय किंवा संशोधनाचा दर्जा काय, संशोधन मूल्य आणि नावीन्य या दोन्हीही आघाड्यांवर ती अमेरिकन किंवा युरोपियन विद्यापीठांशी तुलना करू शकत नाहीत. तंत्रज्ञान, कौशल्य विकास किंवा नावीन्याच्या निर्मितीकरता स्वायत्तता अपरिहार्य आहे. 'आरक्षण' किंवा 'अनुदानातून' त्यांची निर्मिती होत नाही. आजच्या आपल्या शिक्षण व्यवस्थेतून असा आभास निर्माण करणारे काही लाखांनी पदवीधर निर्माण होत आहेत. प्राध्यापक एस. एम. देसरडा यांनी बुधवार १८ नोव्हेंबरच्या लोकसत्तेतील 'विचार' या सदरामध्ये लिहिलेल्या लेखामध्ये हीच गोष्ट खालीलप्रमाणे मांडली आहे.

''वास्तविक पाहता 'शिक्षण खाते' हे राज्यातील सर्वाधिक सार्वजनिक खर्च करणारा विभाग आहे. महाराष्ट्र राज्याच्या दोन लाख कोटी रुपये खर्चाच्या अर्थसंकल्पातील वीस टक्के म्हणजे ४०,००० कोटी रुपये 'शिक्षणाच्या

नावाचे' खर्च केले जातात. अर्थात यातील ९०% शिक्षक-प्राध्यापकांच्या पगारांवर खर्च होतात. या खर्चाच्या तुलनेत शाळा-महाविद्यालये-विद्यापीठांची कामगिरी फारच निराशाजनक आहे. महाविद्यालये व विद्यापीठांतील शिक्षणाची अवस्था विदारकचे आहे. पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या एवढेच काय एम.फिल., पीएच.डी. च्या ९० टक्के विद्यार्थ्यांना एक पानभर कुठल्याही भाषेत संयुक्तिक व शुद्ध मजकूर लिहिता येत नाही. एखादी सचोटीची समिती बसवून आजवर झालेल्या परीक्षांचे काही टक्के पेपरर्स तपासणी केल्यास विशेषतः एम. फिल., पीच.डी. प्रबंध फेरतपासणी केल्यास किती लक्तरे चव्हाट्यावर येतील याची कल्पना केलेली बरी.'' (जुन्याच व्यवस्थेत 'नवे धोरण'?)

आय.आय.टी. मधून पीएच.डी. मिळवण्याकरता ६ ते १४ वर्षे लागतात. या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाण्यामधील राजकारण्यांना पीएच.डी. प्रदान करणाऱ्या विद्यापीठांची कार्यक्षमता वाखाणण्यासारखी आहे. जागतिक दर्जाचे एकही विद्यापीठ भारतात का असू नये याचेही ते कदाचित उत्तर असू शकेल.

'प्रथम' या संस्थेनी केलेल्या प्राथमिक शाळेमधील तपासणीमध्येही, ५वीतील मुलाला ३रीतील, तर ३रीतील मुलाला पहिलेचे धडे वाचता येत नाहीत हे दाखवून दिले आहे. ताण नको म्हणून ८ वीपर्यंत परीक्षा न घेता हसत-खेळत शिक्षण घेतल्यावर, पीएच.डी.पर्यंत पोचणाऱ्या या पिढीकडून दुसरी काय अपेक्षा धरणार?

डॉक्टर अरुण निगवेकर यानी रविवार, २२ नोव्हेंबर २०१५ महाराष्ट्र टाइम्स मधील 'संवाद' या सदरात याला सुसंगत असाच विचार मांडला आहे -

''केवळ महाराष्ट्राचा विचार केला, तर शासकीय कॉलेजे आणि विद्यापीठांतील शैक्षणिक पायाभूत सुविधांसाठी गेल्या ६० वर्षांत ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. महाराष्ट्रात सध्या २० अभिमत विद्यापीठे आहेत. या विद्यापीठांनी ८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक पायाभूत सुविधांसाठी केली आहे.

शिक्षणाचा विस्तार आणि गुंतवणूक या दोन्हींचा विचार केल्यास महाराष्ट्राचा देशात पहिल्या पाच राज्यांत समावेश होतो. परंतु जागतिक पातळीवरील गुणवत्ता, ज्ञानसंवर्धन, ज्ञानशक्तीची वाढ आणि यावाढीसाठी केलेले संशोधन; तसेच उद्योगांच्या वाढीसाठीचे मनुष्यबळ या मापदंडांचा विचार करता, भारताच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा किती हे शास्त्रीयदृष्ट्या अभ्यासण्याची गरज आहे.''

शिक्षणाच्या संदर्भातील आजचे हे 'विदारक' वास्तव माहीत असूनही, पाठीवरील ओझे, शाळांचे तास आणि सर्व नवीन-नवीन 'कल्पक' योजना घेऊन नवीन शैक्षणिक धोरण आणि त्याबरोबर नविन नियंत्रण येतच आहेत. सर्व आघाड्यांवर बोकाळलेला भ्रष्टाचार हा शिक्षणाची नीति आणि सामाजिक मूल्यांपासून झालेली फारकत अधोरेखितच करतो. सरकार 'स्मारक' आणि 'पुतळे' उभारण्यात मग्न, तर प्रत्येक जात/समाज आपण किती 'मागासलेले' आहोत हे आग्रहानी सांगण्यात आणि मागासलेपणाचा शिक्का मारून घेण्यात व्यस्त. विकास किंवा प्रगतीच्या नावाखाली अशा गोष्टी फक्त भारतातच घडू शकतात!

भारतातील सर्वात चांगल्या १० संशोधन संस्थांना आपली केंद्रे बंद करायला सांगणारा 'विद्यापीठ अनुदान आयोगा'चा आदेश हा दुर्दैवीच नाही, तर नोकरशाहीच्या 'वसाहतवादी' आणि 'अरेरावी' मानसिक वृत्तीचे ते द्योतक आहे. दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या शिक्षणाशी निगडित असलेल्या नोकरशहांमध्ये हीच बधिरता दिसून येते. आज खरी गरज आहे ती राजकीय हस्तक्षेप, त्यातून निर्माण होणारी धोरणे आणि त्याचीच पुढची निर्मिती म्हणजे 'बधीर' नोकरशहा यांच्यावर नियंत्रण आणण्याची. 'नियंत्रणमुक्त' शिक्षण हेच भारताला 'महासत्ता' बनवू शकेल.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

* *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
* *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
* *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.